# किशाभाऊंची पत्रं

आपला चिरमंगलाकांक्षी

(कृ. ल. पटवर्धन)



# किशाभाऊंची पत्रं

'स्व'-रूपवर्धिनीचे संस्थापक
कृ. ल. तथा किशाभाऊ पटवर्धन
यांनी लिहिलेल्या पत्रांचे संकलन

'स्व'-रूपवर्धिनी
मंगळवार पेठ, पुणे ४११ ०११

**किशाभाऊंची पत्रं**

'स्व'-रूपवर्धिनीचे संस्थापक
कृ. ल. तथा किशाभाऊ पटवर्धन
यांनी लिहिलेल्या पत्रांचे संकलन

**संपादन** : मिलिंद प्रभाकर सबनीस

**प्रथम आवृत्ती : मकरसंक्रांत महोत्सव (२१ जानेवारी, २००७)**

**प्रकाशक : 'स्व'-रूपवर्धिनी**
फायनल प्लॉट नं. २२/१,
मंगळवार पेठ, बारणे चौक,
पुणे ४११ ०११.
दूरभाष : २६१२१७०४, २६१३४३१०
ई मेल : swaroopwardhinee@vsnl.net

**मुद्रक :**
**प्रतिमा ऑफसेट**
देवगिरी इस्टेट, कोथरूड, पुणे २९.
दूरभाष : (०२०) २५४६ ०२१६

**मुखपृष्ठ व मांडणी** : सचिन माधव जोशी

**ऐच्छिक देणगीमूल्य**

**कृ.** ल. तथा किशाभाऊ पटवर्धन यांनी निवृत्तीनंतर 'स्व'-रूपवर्धिनीची स्थापना केली. आज 'स्व'-रूपवर्धिनीचा विस्तार पत्रं वाचण्यापूर्वी खूप मोठा झाला आहे.

किशाभाऊ आणि 'स्व'-रूपवर्धिनी एकरूप असल्यामुळे 'स्व'-रूपवर्धिनीचाच विचार त्यांनी अगदी शेवटपर्यंत केला. कार्यकर्ते घडविले, असंख्य माणसे जोडली, मने जोडली. मुख्याध्यापक म्हणून निवृत्त झालेले किशाभाऊ हे उत्तम संघटक होते. आज संगणक इ-मेलच्या जमान्यात पत्रलेखन मागे पडले आहे. पण माणसं जोडण्यासाठी वर्धिनीचा विस्तार करताना त्यांनी पत्रलेखनाचा खूप मोठा आधार घेतला. मदतीसाठी, देणगीसाठी पत्र लिहिताना समोरच्या व्यक्तीला त्याचे दडपण वाटू नये अशी काळजी ते घेतच पण अत्यंत स्नेहार्द्र भावनेने कधी अगदी वयानं लहान असणाऱ्या युवकांशीही त्यांनी मित्रत्वाचं नातं या पत्रांतूनच जोडलं. पण त्याचबरोबर समवयस्क ज्येष्ठ कार्यकर्त्यांना पत्र लिहिताना जीवनाच्या तत्त्वज्ञानाची चर्चाही त्यांनी केलेली दिसते. आचार्य विनोबा भावे, संत तुकाराम, स्वामी विवेकानंद, डॉ. हेडगेवार यांची वचने व संस्कार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्कार त्यांच्या शब्दाशब्दातून प्रकट झालेले दिसतात.

सांत्वन, शुभचिंतन व अभिनंदन या दोन्ही दुःख व सुखाच्या गोष्टी वेळेवरच केल्या पाहिजेत यांकडे त्यांचा कटाक्ष असे. त्यामुळे अशी कौतुकांची व सांत्वनाची वेगवेगळी पत्रे या संग्रहात आहेत.

पत्र लिहिताना त्यातील मजकूर ते पुनः पुन्हा तपासून घेत. आवश्यक ते बदल करीत. पुर्नलेखन करीत. शब्दांच्या नेमक्या वापराबद्दल ते जागरूक असत.

या पत्रांत उपदेश-मार्गदर्शन आहे पण त्यामधूनही किशाभाऊंचा प्रेमळ स्वभाव, मिश्किलपणा डोकावत राहतो. 'मी'पणा, अहंकार सोडण्यासाठी जाणीवपूर्वक केलेले प्रयत्न जाणवतात. यश, पुरस्कार, स्तूती यामुळे होणारा कोणताही दुष्पपरिणाम त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झाला नाही.

सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला या पत्रांतील शब्द उपयोगी पडतील असे वाटले. म्हणूनच किशाभाऊंच्या असंख्य पत्रातील मोजकी पण अर्थवाही पत्र या संग्रहात संकलीत केली आहेत.

'स्व'-रूपवर्धिनीचे श्री. शिरीषराव पटवर्धन व श्री. जयंतराव कवठेकर यांनी या प्रत्येक पत्राविषयी, पत्र ज्यांना उद्देशून लिहिली त्या व्यक्तींचा परिचय लिहून दिला.

या बहुमोल पत्रांच्या संकलनाची जबाबदारी 'स्व'-रूपवर्धिनीचा कार्यकर्ता या नात्याने माझ्याकडे सोपविली त्याबद्दल श्री. शिरीष पटवर्धन व 'स्व'-रूपवर्धिनीच्या ऋणात राहणेच योग्य ठरेल.

मिलिंद प्रभाकर सबनीस

दि. ३.९.२०००
पुणे

मा. अध्यक्ष,
'स्व'-रूपवर्धिनी यांसी,
स.न.वि.वि.

गेली काही थोडीशी वर्षे मी 'स्व'रूपवर्धिनीचे काम करण्याचा थोडासा पण नम्र यत्न केला आहे. अल्पस्वल्प यशही मिळविले असेल. परंतु हे सर्व यशही माझे नाही.

***फोडिले भांडार । धन्याचा हा माल ॥***
***मी तो हमाल । भारवाही ॥***

परंतु आता गेली दीड वर्षे माझ्या मनात असे येते आहे की मी ह्या कामाला सर्वार्थानं खूपच अपुरा पडतो आहे. ह्या सर्वांचे मुख्य कारण शारीरिक श्रम व त्यामुळे मानसिक ताण मला झेपत नाही. म्हणून दीड-दोन वर्षापासून आपण ह्या कामातून निवृत्त व्हावे असे प्रकर्षाने वाटू लागले होते.

विवेकानंदांनी त्यांच्या 'शक्तिशाली विचार' ह्या पुस्तकात माझ्या विचाराला पुष्टी देणारा विचार मांडला आहे. त्यात ते म्हणतात की, ''भारतातील पूर्वीच्या नियमाप्रमाणे प्रत्येक स्त्री-पुरुषाने आपल्या आयुष्याच्या अखेरीस सामाजिक जीवनातून पूर्ण निवृत्त व्हावे.'' म्हणून मला दि. १.१.२००१ पासून निवृत्त होण्याची परवानगी मिळावी अशी नम्र विनंती आहे.

मी माझ्या अल्पशक्तिनुसार, डॉ. हेडगेवार यांनी सांगितल्याप्रमाणे तन-मन-धनपूर्वक समाजाची सेवा करण्याचा प्रयत्न केला आहे. ही सेवा करण्याची संधी आपण सर्वांनी व समाजाने मला दिली आहे आणि माझ्या अनेक दोषांकडे सगळ्या कार्यकर्त्यांनी डोळेझाक करून माझ्याकडून ही सेवा करवून घेतली आहे ह्याबद्दल मी सर्वांचा व समाजाचा सर्वस्वी ऋणी व कृतज्ञ आहे.

आता माझ्या हाताना कंपवात सुरू झाल्यामुळे मला सध्या सहीही नीट करता येत नाही. तेव्हा ह्या सहीतूनही मला कार्याध्यक्षपदाबरोबर मुक्त करावे ही प्रार्थना.

यापुढे माझ्यावाचून कोणतेही काम अडेल असे मला मुळीच वाटत नाही. तरी पण जर आवश्यक असेल आणि आपण आज्ञा दिलीत तर शक्य ती सर्व सेवा करण्याचा मी शिकस्तीचा प्रयत्न करीन.

मी स्वतः काही केले आहे असे मला वाटत नाहीच आणि वाटूही नये ही परमेश्वर चरणी प्रार्थना.

संत ज्ञानेश्वर माऊली देखील म्हणतात की,

*परि हे तुमचे नी झाले । म्या हे नाही केले ॥*
*धर्म कीर्तन सिद्धी गेले । तुम्हा कारणे ॥*

माऊलीच्या पावलांच्या धुळीचीही सर मला नसताना मी असे कसे म्हणू की, "मी हे केले."

पुन्हा एकदा सर्वांच्या सहभागाबद्दल धन्यवाद.

माझ्या हातून जे काही अल्पस्वल्प परमेश्वराने करवून घेतले त्या परमेश्वरास मी विसरून कसे चालेल ? म्हणून त्या सर्वशक्तिमान श्री परमेश्वराच्या कृपेची मला सतत जाण आहे.

श्री समर्थ रामदास म्हणतात,

*सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयांचे ॥*
*परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ॥*

सदैव आपला
चिरमंगलकांक्षी,
कृ. ल. पटवर्धन

निवृत्तीनंतर आपणच सुरू केलेल्या कामातून खऱ्या अर्थाने निवृत्त होणं ही सोपी गोष्ट नाही. कै. किशाभाऊंच्या दैनंदिन साधनेमुळेच त्यांना असे दूर होणे शक्य झाले. संस्था जीवनाचा आवश्यक असा एक फार मोलाचा संस्कार या कृतीतून त्यांनी कोरला आहे.



दि. ११।७।८०
पुणे

मित्रवर्य मधूला - स. न. वि. वि.

तुझे मोजक्या शब्दाचे अर्थवाही भरपूर असलेले पत्र मिळाले. त्यातील माझ्या स्तुतीचा भाग वगळता बाकी मजकूर खूपच वाचनीय व चिंतनीयही आहे. स्तुतीबद्दल मी एवढेच म्हणेन की, —

'स्व'-रूपवर्धिनी' म्हणजे 'Beauty Parlour' हे अनेक मित्रांनी सुचविले व ते फारसे चुकही नाही. पण साधे, सोपे, सुटसुटीत व अर्थवाही नाव अनेक साहित्यिक व प्रतिभाशाली, शब्दवेत्त्यांनाही विचारून त्यांना जेव्हा काही सुचले नाही तेव्हा नाईलाजाने Emergency म्हणून हे नाव निवडले. परंतु अजूनही त्यात तुझ्यासारख्या प्रतिभावान मंडळींच्या सूचना स्वागतार्ह आहेत. हेही नाव वज्रलेप नाही. तेव्हा तू जर काही नावे सुचवू शकलास व ती पसंत पडली तर त्यातलेच एखादे छान नाव ठेवू. त्याबद्दल तुला अगाऊच धन्यवाद देऊन ठेवितो.

तुझ्या अपेक्षेप्रमाणे पैसे लवकर गोळा व्हावेत हे आहे. कारण आता ६१ वे वर्ष लवकरच लागणार त्यामुळे ताकद तेवढी कमी होणार हे नैसर्गिक नाही का ?

उर्जेच्या सागरात तू पोहोतो आहेस आणिक मी ती कसली कामाने नवीन ऊर्जा तुला पुरविणार ?

सदैव आपला
चिरमंगलकांक्षी आणि स्नेहाकांक्षी,
कृ. ल. पटवर्धन

'स्व'-रूपवर्धिनीच्या स्थापनेनंतर
लगेच त्याच्या नावाबद्दल
चर्चा चालू असताना
लिहिलेले हे पत्र

परम मित्रवर्य कन्हैयाला -

स. न. वि. वि.,

मी सुरू केलेल्या कामात तू अगदी प्रथम पासून मोठ्या आपुलकीने व सहानुभूतीने नुसते लक्ष घातलेस असे नव्हे तर अगदी अनेक वेळा अपेक्षा नसतानाही द्रव्य सहाय्य दिलेस ह्यामुळे तुझ्या मनाचा मोठेपणा प्रत्ययास आला. आचार्य रजनीशजींची पुस्तके वाचणारे मी अनेक पाहिले त्यांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यासही अनेकजण करतात पण विचार वाचून आचार करणारे फारच थोडे दिसतात. त्या थोड्यांमध्ये तुझा क्रमांक आहे. बरं नुसते पैसे देऊन त्याचा अहंकार बाळगणे तर दूरच तर उलट, नुसते कानांनी ऐकल्यावर स्वतः मोटार घेऊन येऊन मुलांचं जेवण घेऊन शिबीर पाहायला स्वतः येणे ह्यातही तुला कमीपणा वाटला नाही. तुझा हाच मनाचा मोठेपणा व पचविलेले तत्त्वज्ञान असे मी मानतो. ह्या सर्वच तुझ्या वागण्यावर मी अत्यंत खूश आहे आणि त्या सर्वाबद्दल आभार मानून अंतर निर्माण करण्यापेक्षा मी ते न मानता आपुलकी ज्यात वाटते ते करण्यातच अभिमान बाळगतो.

कळावे. लोभ व प्रेम तर आहेच आहे, वृद्धि देखील आहे आणि अशा कामाला अत्यंत आवश्यकताही आहे.

सदैव आपला<br>
चिरमंगलकांक्षी आणि स्नेहाकांक्षी,<br>
कृ. ल. पटवर्धन

'स्व'-रूप वर्धिनीचे काम सुरू झाल्यानंतर मदतीचे अनेक हात सहजतेने पुढे आले. अशा मित्रांमधील श्री. कन्हैयालाल बलदोटा हे एक. वर्धिनीतील मुलांच्या शिबिरासाठी केलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या भावनांचे दर्शन पत्रातून घडले.



दिनांक : ३०-११-८९<br>
पुणे

मित्रवर्य श्री. मधुकरराव गानू यांसी,

स.न.वि.वि.

आपली खरी म्हणजे ओळख डेक्कन क्वीनमध्ये झाली आहे. परंतु ज्या सहृदतेने आणि आपुलकीने आपण 'स्व'-रूपवर्धिनीच्या कामाकडे पाहिले आहे आणि जे सक्रिय सहाय्य दिले आहेत, त्यामुळे आपल्याबद्दल एक वेगळीच आपुलकी उत्पन्न झालेली आहे. सामान्यपणे समाजातली मोठी माणसे ही आत्मकेंद्रीत असतात असे पाहिले आहे. आपल्यासारख्या केवळ प्रवासात 'स्व'-रूपवर्धिनीसारखे काम ऐकून त्याला सहाय्य करावे असे वाटणारे फारच थोडे, त्यापैकी आपण एक आहात आणि म्हणून आपल्याला 'स्व'-रूपवर्धिनीची हालचाल सविस्तर कळवावी यासाठी हा पत्रप्रपंच करीत आहे.

जूनमध्ये शाळा सुरू होण्यापूर्वी आपली खालीलप्रमाणे तीन शिबिरे झाली.

१) सुमारे १२५ ते १५० मुलामुलींचे मिळून एक शिबीर झाले ते अर्थातच पुण्यात होते.

२) शिवापूरलाही सुमारे २५ महत्त्वाच्या युवक कार्यकर्त्यांची एक-दोन दिवसांची प्रदीर्घ बैठक झाली. त्यालाही उत्तम प्रतिसाद मिळाला. अपेक्षेप्रमाणे त्याचा योग्य तो परिणाम मुलांवर झाला असावा असे वाटते. जूनमध्ये शाळा सुरू झाल्यानंतर मुलांचा रामकृष्ण, विवेकानंद व अखंडानंद या तीनही शाखांची व्यवस्थित वाढ झाली. विवेकानंद या शाखेचे मध्यवर्ती आणि चांगल्या ठिकाणी स्थलांतर केले. त्या नवीन ठिकाणीही चांगला प्रतिसाद मिळाला. एकमेकांपासून या शाखा सहा-सात मैल दूर असल्या तरी तीनही शाखा युवक कार्यकर्तेच सायकलवरून जाऊन चालवितात.

४) महिलांसाठी दुपारच्या वेळात वेगवेगळे कार्यक्रम आपण सुरू करू शकलो.

अ) ५० महिलांचा सहा महिन्यांचा शिवणवर्ग नाममात्र ५ रु. शुल्क घेऊन सुरू झाला आहे. या वर्गात १२ प्रकारचे कपडे शिवण्याचे शिक्षण महिलांना देण्यात येते. हा वर्ग दुपारी २ ते ४ या वेळात चालतो.

ब) २० महिलांचा गृह-शुश्रूषा (Home-Nursing) चा शिक्षणक्रम असतो, याशिवाय भरतकाम, भजनवर्ग आणि प्रौढशिक्षण वर्ग असे हळूहळू सुरू झाले आहेत. ह्या प्रत्येक वर्गांना वीस-पंचवीस महिला असतात.

५) 'आजोळ' - दुपारी १ ते ५ हा प्रकल्प असतो. घरी एकटी असलेली मुले, ज्यांचे आईवडील दोघेही कामाला जातात अशा सुमारे ४० मुलांच्या सर्वांगीण विकासाचा प्रयत्न आपण करीत असतो, त्यालाही किमान १० रु. शुल्क फक्त ठेवले आहे.

६) सकाळी व्यायामशाळा सुरू केली असून त्यासाठी शक्य तितके सर्व अत्याधुनिक व्यायाम साहित्य खरेदी करून ठेवले आहे. त्याचा पंचवीस-तीस मुले लाभ घेतात.

७) एका मुलाला व्यसनमुक्तीचे शिक्षण घेण्यासाठी नेमले आहे. त्याचा प्रयोग २० व्यसनाधीन माणसांवर चालू आहे.

८) विविध कामांसाठी पुरेशी नसली तरी पुष्कळ माणसे हळूहळू मिळत आहेत. साधारणपणे दिवसातून दहा-पंधरा तास आपल्या वास्तूचा उपयोग मुले अभ्यासासाठी करतात. एकूणच साधारणपणे पहाटे ५ ते रात्री १२ पर्यंत जवळ जवळ दिवसभर आपली वास्तू कमी-अधिक प्रमाणात वापरली जाते. याशिवाय नैमित्तिक सेवाभावी संस्थांच्या बैठकी, व्याख्याने, चर्चासत्रे यासाठी वास्तूचा उपयोग होतो. तो वेगळाच.

एकूणच समाजाने आपल्याला दिलेल्या १६ लाख रुपयांचा पूर्ण मोबदला समाजाच्या पदरात बांधण्याचा खटाटोप आपण करीत आहोत. हळूहळू ह्यापेक्षा अधिक चांगल्या पद्धतीने ही वास्तु वापरण्यात यावी असे आपले प्रयत्न चालू आहेत. या १६ लाखांपैकी एकही पैसा सरकारी मदत, महानगरपालिकेचे अनुदान किंवा बँकेचे कर्ज आपल्याला घ्यावे लागले नाही. केवळ आपल्यासारख्या उदारहस्तानेच ही वास्तु उभी झाली आहे. सध्या तरी या वास्तूचे शिकस्तीचा उपयोग स्वयंसेवी कार्यासाठी व कार्यकर्ते निर्माण करण्याचा येथे प्रयत्न सुरू आहे. कार्य व कार्यकर्ते आहेत परंतु सध्याच्या वास्तूत जागा नाही, अशी ज्या वेळी अवस्था येईल त्यावेळी आपल्या वास्तूवर आणखी दोन मजले बांधण्याची परवानगी आहे; ते बांधायला प्रारंभ करावा असे आता ठरवले आहे. येत्या दोन-तीन वर्षांमध्ये अशी अवस्था येईल असा अंदाज आहे.

आता आर्थिक बाबींसंबंधी जर म्हणाल तर १६ लाख रुपयांव्यतिरिक्त पाच-सहा लाख रुपये आपण गेल्या दहा-अकरा वर्षांत मुलांच्या विकासासाठी खर्च केले आहेत, ते वेगळेच आणि तेही समाजाने दिलेले आहेत. वास्तु बांधल्यानंतर म.न.पा.चे कर, वीज बिले, रंगरंगोटी, दुरुस्तीसाठी आता जास्त खर्च करावा लागेल. पूर्वीचे जे शिक्षकांचे मानधन, पूरक आहार, मुलांची औषधे, सहल, शिबिरे इत्यादी जादा खर्च आहेत ते आहेतच. एकूण गेल्या वर्षात सुमारे



दीड लाख रुपये खर्च आणि या वर्षात अंदाजे दोन लाख रुपये या सर्व कामासाठी खर्च करावे लागणार आहेत. याची आपण खालीलप्रमाणे तीन प्रकारची योजना केली आहे.

१) आपल्या सल्ल्याप्रमाणे काही धनसंग्रह करून त्यातून मिळणारे व्याज.

२) आपल्या वार्षिक कार्यवृत्तातून मिळणारे जाहिरातींचे उत्पन्न.

३) वार्षिक २०० किंवा १,००० च्या पटीत रक्कम देणारे कायम स्वरुपाचे देणगीदार. आपल्यासारख्या मंडळींनी हा विषय जरा लक्षात ठेवून आपले मित्र, हितचिंतक व अन्य संभाव्य देणगीदार यांच्याशी जाता-जाता जर आपल्याला बोलता आला तर त्याचा निश्चित चांगला उपयोग होऊ शकेल.

तरी आपण जसे पूर्वीही सहकार्य केले तसेच ते आताही जर करू शकलात तर धनसंग्रहाचा वाचणारा जो वेळ आहे तो शिक्षण आणि संस्कार या खऱ्या कामासाठी वापरता येऊ शकेल.

आपल्याला हे विनवण्याचे कारण आपल्याला ह्या कार्याबद्दल आपुलकी आहे.

कळावे, ती. सौ. वहिनींना सा न.

लहानांस गोड आशीर्वाद, लोभ तर नक्कीच आहे, वृद्धीची अपेक्षा आणि आवश्यकताही आहे.

कळावे
आपला स्नेहाकांक्षी
कृ. ल. पटवर्धन

■ ■

'स्व'-रूपवर्धिनीचे कामाला आर्थिक स्वरूपात आणि अन्य प्रकारे सहाय्य करणारी अनेक माणसे कै. किशाभाऊंनी डेक्कन क्विनच्या प्रवासात जोडली. किंबहुना डेक्कन क्विननेच मुंबईचा व ते ही प्रथम श्रेणीच्या डब्यातून जाण्यामागे त्यांचा हेतू हा कामाला उपयुक्त माणसे जोडणे हाच होता. या जोडलेल्या मित्रांना कामाचा वृत्तांत वेळोवेळी पाठवून 'स्व'-रूपवर्धिनी हा या मित्रांचाही अग्रक्रमाचा विषय कै. किशाभाऊंनी केला.

दि. १२-१-९१
पुणे

परममित्र मूळचंद यांसी

स. न. वि. वि.

अभिनंदनाचे पत्र मिळाले ते आज. आठवणीने अगत्यपूर्वक पत्राने तू अभिनंदन केलेस याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद.

कामाच्या दृष्टीने प्रसिद्धी आवश्यक. कारण त्यामुळे काम वाढते. परंतु कामाबरोबर अहंकार जर वाढला तर मात्र काम मार खाते हे सूत्र लक्षात ठेवून प्रसिद्धीच्या मागे कार्यकर्त्यांनी लागावे. प्रसिद्धिच्या पाण्यामध्ये कमळाच्या पानाप्रमाणेच कोरडे राहिले पाहिजे. एकदा ही प्रसिद्धीची हवा डोक्यात गेली व अहंकार फुलत गेला म्हणजे मग कार्यकर्त्यांत स्पर्धा सुरू होऊन मंत्र्यासारखी अवस्था होते. प्रसिद्धी पराङ्मुखता, चांगली. किंबहुना मला ती आवडते. तथापि त्यामुळे कार्यहानी होऊ नये हे पथ्य पाळले. म्हणूनच आवश्यक तेवढी स्वतःला विसरून कामासाठी प्रसिद्धी असावी, हा सर्व विचार डोक्यात ठेवून मी त्या कार्यक्रमाला गेलो होतो, नाहीतर

***'पूज्य झालो, अंगा आला अभिमान***
***पुढील कारण खोळंबले.'***

असे तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे होऊ नये हीच ईश्वरचरणी प्रार्थना. पुन्हा एकदा अभिनंदनाबद्दल आभार. कळावे. लोभ तर आहेच आहे. वृद्धीची अपेक्षा व आवश्यकताही आहे.

सदैव आपला
चिरमंगलकांक्षी,
कृ. ल. पटवर्धन

प्रसिद्धीच्या वाटेने जावे लागले तर त्या
निसरड्या रस्त्यावर कार्यकार्याने भान ठेवून
कसे चालावे याचे
सहज संस्कार या पत्रातून उमटले आहेत.



दि. २९।१।९१
पुणे

आदरणीय नाना यांसी,

सप्रेम नमस्कार वि. वि.

ध्येयधुंद माणसे अनेक असतात. परंतु एका हातात ध्येय आणि दुसऱ्या हाताने व्यवहार सांभाळून समतोल जीवन साधणारे कमी. पण अशा क्वचित व्यक्तींपैकी आपण एक आहात आणि आमचे व 'स्व'-रूपवर्धिनीचे भाग्य असे की नानांचा सहवास ज्या भाग्यवंतांना मिळाला त्या श्रीमती पुष्पाताई, मी आणि वर्धिनीतले अनेक वर्धक आहेत.

आपले अभिनंदनाचे, कौतुकाचे, माझ्या मते किंचित अवास्तव स्तुतीचेही म्हणता येईल असे पत्र मिळाले. आपण लिहिलेल्या गुणांपैकी काही गुण माझ्यात आणण्याचा अवश्य प्रयत्न करीन. ते गुण यावेत अशी मात्र इच्छा आहे. हल्ली अनेक प्रतिष्ठाने अस्तित्वात आलेली आहेत आणि त्या सत्कारार्ह व्यक्तींच्या शोधातच असतात आणि त्यामुळे माझ्यासारख्या अगदीच सामान्य व्यक्तीचाही सन्मान होऊ शकतो. यात मला वाटते की, व्यक्तीच्या मोठेपणापेक्षा प्रतिष्ठानाची संख्या जास्त. त्यामध्ये माझाही नंबर लागून गेला.

हे जरी सर्व खरे आहे तरी सत्कार स्वीकारण्यात माझा मुख्य हेतू वर्धिनीला ५,००० रु. मिळतात हाच आहे आणि खरे म्हणजे आपल्याला नागपूरचा जो 'केशव प्रसाद' मिळाला आहे तोच प्रसाद त्याच प्रवृत्तीने मी वाटण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यातूनही हल्लीच्या जाहिरातींच्या युगात कामासाठी का होईना प्रसिद्धी आवश्यक असली तरीही व्यक्तीच्या डोक्यात प्रसिद्धीची हवा जाणे उपयोगाचे नाही. नाही तर मग मंत्र्यांसारखी अवस्था होते.

प्रसिद्धी पुढे आणि काम मागे, म्हणून प्रसिद्धी पचवताना फार काळजी घ्यावी लागते. नाहीतर ही हवा एकदा डोक्यात गेली की, त्याचा फुगा हायड्रोजनच्या फुग्याप्रमाणे वर जातो आणि तो केव्हा फुटेल याचा नेम नसतो. हे जरी सर्व खरे असले तरीही प्रसिद्धीवाचून जर काम अडत असेल किंवा प्रसिद्धीमुळे अधिक गती घेत असेल तर वैयक्तिक आवड-निवड बाजूला ठेवून फक्त कामापुरतीच प्रसिद्धी काम करणाऱ्या माणसाने केली पाहिजे, असे मला या बाबतीत वाटते. आपण केलेल्या कौतुकाबद्दल मी आपला शतशः आभारी आहे.

सौ. लीलाचे सदैव सतत सहकार्य मिळाले म्हणूनच केवळ वर्धिनीचे काम करताना मला दिवसेंदिवस अधिक आनंद मिळत गेला. या सबंध काळात तिने सहन केलेला एकलेपणा हाही काही कमी त्रासाचा नव्हता, याची मला जाण आहे. माझ्यापेक्षाही ती

आपल्याला आहे त्याबद्दल मला आपलेही कौतुक वाटते. आपल्या पत्रातील त्याचा खास उल्लेख हा विसरता येण्यासारखा नाही.

आपण मात्र नेटका संसार करून परमार्थही चांगला साधलात हेही काही थोडे नाही. एका म्यानात एक तलवार संभाळून संसार करणारे अनेक परंतु आपल्यासारखी माणसे संसार आणि परमार्थ अशी दोन तलवारीची पाती एकाच म्यानात संभाळत आहेत हे आश्चर्य नाही का ? आणि त्याचवेळी अनंत अडचणी आणि दुःखे आपल्या समोर आली असताना ज्या धीरोदात्तपणे आपण त्यांना तोंड दिलेत आणि देता आहात तो माझ्यासारख्या माणसासमोर उत्तम आदर्श !

सौ. वहिनी आणि आपल्या घरची अन्य मोठी माणसे यांची तब्येत आता कशी आहे ? कळले तर खूप बरे वाटेल. परमेश्वराने या सर्व मंडळींना सुखात ठेवावे आणि नानांना आनंद मिळावा अशी त्याची मी प्रार्थना करतो. सौ. वहिनी व इतर थोर मंडळींना सप्रेम नमस्कार व लहानांस आशीर्वाद. कळावे, लोभ तर आहेच आणि वृद्धीची मात्र निश्चितच अपेक्षा आणि आवश्यकताही आहे.

सदैव आपला
चिरमंगलाकांक्षी
कृ. ल. पटवर्धन

श्री. नाना जोशी यांनी केलेल्या अभिनंदनाबद्दल व्यक्त केलेली भावना या पत्रातून दिसले. काम करणाऱ्या कार्यकर्त्याचा सन्मान होतो पण त्याला काम करायला मोकळीक देणाऱ्या 'घरच्या आघाडी'विषयी वाटणाऱ्या भावना ही या पत्राची विशेषता.



दि. १२।६।९१
पुणे

चिरंजीव विलासला अनेक आशीर्वाद

तुझे २८।५ चे पत्र मिळाले. मजकूर समजला. आनंद वाटला. कामाची गती पाहून बरे वाटले. येथील शिबिरामुळे तेथील वातावरणात फरक पडला आहे हे वाचून कोणाला आनंद होणार नाही ?

नानांनीसुद्धा तुझ्या यशाचे कौतुक करावे त्याचबरोबर तुझ्याबद्दल नानांना वाटत असलेला विश्वास, आपले बंधुराज 'विश्वास' याच्यापेक्षा तो जास्त मोलाचा आहे. सोशल ऑफिसर म्हणजे नेमकी नानांची काय कल्पना आहे ते विचारून घे. त्यांच्या तुझ्याकडून नेमक्या काय अपेक्षा आहेत हे जाणून घे. माझ्या मताप्रमाणे संपर्क अधिकारी जे काम करीऊ ते काम तुझ्याकडून अपेक्षित असावे. मला जी माहिती आहे त्याप्रमाणे नवीन नवीन माणसे गाठणे, त्यांच्याशी संपर्क ठेवणे त्यांना कंटाळवाणा होणार नाही इतका संपर्क वाढविणे, आपले म्हणणे हर युक्ती-प्रयुक्तीने त्यांना पटवून देणे आणि आपले काम त्यांच्याकडून करवून घेणे. त्यामध्ये यश मिळविणे यासाठी सगळ्यात आवश्यकता आहे ती म्हणजे आपल्या कामावरच्या दृढ विश्वासाची (conviction). म्हणजे मग आपोआप आपला तोल न जाऊ देता आपले म्हणणे गोड शब्दाने पटविता येईल. हे सर्व तुला जमेल का याचा विचार कर.

तुझे मुलांना व मालकांना हाताळण्याचे कौशल्य आवडले. पत्र पाठविण्यास उशीर झाला. कारण तू काय करावेस याचा मीच निर्णय अजून करू शकलो नाही. मला वाटते, तू इथे लवकर जेव्हा येऊ शकशील तेव्हा, तू, मी, विश्वास, शि.प. असे एकत्र बसून पूर्ण विचार करून निर्णय घेऊ. येताना मात्र तू रक्तपेढीत काम करत असताना तुझी पैशाची अपेक्षा आहे का ? किती आहे ? नाना तेवढे पैसे तुला देणार आहेत का ? किती देतील ? तू हे काम करावेस अशी त्यांची कल्पना आहे इ. सर्व गोष्टींचा सविस्तर खुलासा नानांना विचारून घे म्हणजे निर्णय घेणे सोईचे पडेल.

कळावे. लोभ तर आहेच वृद्धीची अपेक्षा आणि आवश्यकताही आहे.

सदैव आपला
स्नेहाकांक्षी
कृ. ल. पटवर्धन

औरंगाबाद येथील उत्तम पगाराची नोकरी सोडून रक्तपेढीच्या कामासाठी पूर्णवेळ बाहेर पडण्याच्या विचारात असलेल्या विलास कुलकर्णी या कार्यकर्त्याला लिहिलेले हे पत्र. संपर्क अधिकारी म्हणून अनेक वर्षे काम प्रत्यक्ष केलेले असल्याने, या कामातून नेमके काय करणे अपेक्षित आहे, याची कल्पना देणारे पत्र

दिनांक - २१।७।९१
पुणे

श्री नथमलशेट बल्दोटा यांसी -

कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार.

कर्तृत्त्वसंपन्न, व्यवहारिक चातुर्य, भविष्याचा अचूक वेध घेऊन धाडसाने उद्योगव्यवसाय करणे आणि परमेश्वरकृपेने त्यात यश मिळवणे हे अनेकांना जमते आणि एवढी संपत्ती संपादून पुन्हा कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पडल्यानंतरदेखील सामाजिक जाण असणारी माणसे फारच थोडी आहेत, अशी जाण असूनसुद्धा ती कृतीत आणणारी माणसे त्याहून थोडी. अशा अत्यल्प माणसांच्यापैकी आपण एक महान गृहस्थ आहात. हे सर्व विचार सुचण्याचे कारण आपण काही दिवसांपूर्वी जे मौलिक सहाय्य केले आहे, ते आहे. जरी हा विचार पूर्वीपासून होता तरी त्याला शब्दरूप देण्याचे निमित्त मला मिळाले म्हणून हा पत्रप्रपंच.

माझ्या सेवानिवृत्तीच्या दुसऱ्याच दिवशी मी 'स्व'-रुपवर्धिनीचे काम सुरू केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, रामकृष्ण मिशन, ज्ञानप्रबोधिनी आणि कै. सोनोपंत दांडेकरांचा सहवास आणि त्यांच्या 'प्रसाद' मासिकासाठी केलेले काम ह्याचा मला खूप फायदा झाला. गरीब मुलांची शिक्षणाची आबाळ पाहून, केंद्राचे काम करून गरीब आणि हुशार होतकरू मुलांच्या शिक्षण आणि कल्याणासाठी स्वतःच्या खिशातले हजारो रुपये खर्च करून सुमारे ५०,५५ वर्षे घालविली आहेत. आणि ह्या सर्वांचा अनुभव, विचार, अनेक ग्रंथांचे वाचन आणि चिंतन केले. त्यातून 'स्व'-रुपवर्धिनी साकार झाली. सुदैवाने आज त्यात २५० ते ३०० गरीब, होतकरू, हुशार विद्यार्थी आपले व्यक्तिमत्त्व फुलवून घेत आहेत.

वास्तविक मला स्वतःला किमान आवश्यक त्या अन्न, वस्त्र, निवारा ह्या गोष्टींत कुठेही काहीही कमी नाही. पुरेपूर नव्हे भरपूर आहे व आयुष्याच्या अखेरपर्यंत त्या कमी पडणार नाहीत. कदाचित मी आरामात आणि आळसात वेळ घालवू शकलो असतो. कदाचित अधिक चैन करता येणार नाही एवढेच फार तर होईल. असा माझ्या दृष्टीने सुविचार करून मी, दि. १ जाने. ७९ ला शाळेतून हेडमास्तर म्हणून सेवानिवृत्त झाल्यावर असे ठरविले की, उरलेल्या आयुष्यात स्वतःचा वेळ आणि शक्ती खर्च करून स्वतःसाठी किंवा स्वतःच्या कुटुंबासाठी आपण पैसे आयुष्यात मिळवावयाचे नाहीत आणि उरलेले आयुष्य हमाल, मोलकरीण, रिक्षा ड्रायव्हर, दगड फोडणारे कामगार, वडार, फेरीवाले अशा दीनदुबळ्या गरीब लोकांच्या हुशार, होतकरू मुलांच्या शिक्षणासाठी सर्व वेळ खर्च करायचा आणि एक प्रकारे वानप्रस्थाश्रमाचे आयुष्य घालवावयाचे असा पूर्ण विचार करून २ जाने. ७९ म्हणजेच सेवानिवृत्तीच्या दुसऱ्या दिवशी 'स्व'-रूपवर्धिनीचे



काम सुरू केले व तेही वर्षातून एकही दिवस सुट्टी न घेता. गेल्या बारा, तेरा वर्षात मी एकदाही सुट्टी घेतलेली नाही. कौटुंबिक कारणासाठी किंवा आजारासाठी काही दिवस कामाचे गेले असतील तेवढेच. काम करीत असताना अनेक वेळा मनःस्ताप, अपमान, लोकांची त्रासदायक वागणूक, उद्वेगजनक प्रसंग आले. परंतु ते सर्व सहन करूनसुद्धा हे काम उभे करावयाचेच, मध्येच सोडायचे नाही, हे नक्की ठरवून काम करीत राहिलो आणि भगवंताच्या कृपेने त्यात बऱ्यापैकी यशही मिळाले. आज कमीत कमी दहा-वीस मुले तरी बी.ए., एम.ए., बी.कॉम., बी.एस्सी. अशी उच्च श्रेणीत उत्तीर्ण झालेली मी पाहिली आणि माझी दिशा बरोबर असल्याचा मला खूप आनंद झाला.

एवढे सर्व विस्ताराने लिहिण्याचा हेतू सरांचा 'अव्यापारेशू व्यापार', लष्कराच्या फुकट भाकऱ्या भाजणे नसते. कशासाठी हा सर्व ताप ? असे काही कोणाच्याही मनात येऊ नये. माझ्या कामामागची प्रेरणा, उद्देश आणि फलित हे स्पष्टपणे आपल्याला कळावे आणि मग मीही समाजासाठी भीक का मागत आहे हे लक्षात यावे, म्हणून मुद्दाम लिहिले आहे.

कळावे, आपल्यासारख्या वयोवृद्ध, तपोवृद्ध, ज्ञानवृद्ध आणि अनुभवसिद्ध माणसाला माझ्यासारख्या अज्ञानी, अव्यवहारी आणि अनानुभवी माणसाने अधिक काय लिहावे. माझे हातून जर आपला काही अधिक्षेप झाला असेल, एखादा उणाअधिक शब्द लिहिला गेला असेल अथवा बोलला गेला असेल तर त्याबद्दल क्षमा असावी आणि पुन्हा एकदा आपण केलेल्या सहाय्याबद्दल मनःपूर्वक आभार मानून हे उगीचच लांबलेले पत्र थांबवतो.

कळावे लोभ तर नक्कीच आहे, वृद्धिची अपेक्षा आणि आवश्यकताही आहे. घरच्या सर्व थोर मंडळींना, मित्रांना सप्रेम नमस्कार व सर्व लहान, गोड बालचमूला गोड गोड आशीर्वाद.

सदैव आपला आशीर्वादाकांक्षी

कृ. ल. पटवर्धन

विचारपूर्वकच अनेक व्यक्ती सामाजिक कार्याला आरंभ करतात. काम आणि कामातून समाजाच्या अपेक्षाही वाढतात पण नेमक्या याच टप्प्यावर अनेक कामे अडखळतात, बंद पडतात. सामाजिक कामालाही व्यावहारिक कुशल माणसांची जोड लागते याची जाणीव ठेवून कै. किशाभाऊ पटवर्धनांची पहिल्यापासून अशी व्यावहारिक कुशल माणसे जोडावी श्री. बलदोटा हे त्यातील एक. अशा व्यक्तींचा सल्ला त्यांनी मानला आणि त्यांच्या मनातील सामाजिक सद्भावनेला वर्धिनीच्या रूपाने सक्रीयही केले.

दिनांक : २३।७।९१
पुणे

मित्रवर्य रामकृष्ण यांसी,

स. न. वि. वि.

तशी माझी आणि तुझी नात्यापेक्षा मैत्रीत रूपांतर होण्याची शक्यता असूनही अंतरामुळे, व्यवसाय भिन्नतेमुळे ज्या प्रमाणात मैत्री व्हायला हवी होती तशी झालेली नाही हेही खरे आहे. ध्येयवादी एकवाक्यता असल्यामुळे मैत्री तुटू शकली नाही. माझ्या जीवनातला अनुभव असा आहे की नात्यापेक्षा जुळलेले मनाचे धागेच मजबूत असले म्हणजे संकटावर मात करणे सोईचे होते आणि ही मैत्री किंवा मनाचे धोगे जोडण्याला तशी ध्येयधुंदी हे एक कारण आहे. तसेच भौगोलिक, भाषिक व्यवसाय अशा अनेक कारणांनी ही मैत्री जुळून येत असते. पण केव्हाही ध्येयशरण मैत्री ही चिरकाल आणि शाश्वत असते. विशेषतः संघासारख्या कामामध्ये ह्याचा अनेक वेळा अनुभव येतो. नातेवाईकांपेक्षा मित्रांनी मदत करून आणि तीही निःस्वार्थ, निरपेक्ष आणि निरंहकारी बुद्धीने केल्यामुळे अनेकांची अडचण, त्रास दूर झाल्याचे माझे निरीक्षण आहे. माझ्या स्वतःच्या जीवनातला एक अनुभव लिहिण्यासारखा आहे.

मी माझे घर ज्यावेळी बांधले, त्याच्या प्लॉट खरेदीपासून घर पूर्ण बांधून होईपर्यंत अनेक मित्रांनी अनेक प्रकारे सहाय्य केले. प्लॉटचे पुरेसे पैसे नसताना माझ्या सोयीप्रमाणे ते घेणे, इतकेच नव्हे तर ७,५०० रुपयांचा भूखंड ६,५०० रुपयाला देण्याचे मालकाला दिलेले वचन पाळण्यासाठी स्वतःच्या पदरचे हजार रुपये घालणारा मित्र जसा मला भेटला, तसाच घर अर्धवट बांधलेले राहू नये म्हणून माझ्याजवळचे पैसे संपले असताना परस्पर ठेकेदाराला "यापुढील बिलाचे पैसे माझ्याकडून घेऊन जायचे." हेही सांगणारा मित्र मला भेटला. पण या सर्वापेक्षा कळस म्हणजे मला पाचसातशे रुपयांची मदत करण्यासाठी अपरंपार कष्ट करूनही ज्या क्षणी त्याचे पैसे मला देण्याइतके पुरेसे पैसे जमवता आले नाहीत, तेव्हा माझ्या मित्राने बायकोच्या अंगावरचे दागिने विकून मला पूर्ण हवे तेवढे पैसे दिले, हे जेव्हा मला कळले तेव्हा मी अक्षरशः हळहळलो. एका डोळ्याने आनंदाश्रू आणि दुसऱ्या डोळ्याने दुःखाश्रू गाळण्यापलीकडे मला त्यावेळी काहीच करता आले नाही. मैत्रीचा आनंद उपभोगत असताना त्याने माझ्यासाठी केलेले कष्ट आणि त्याग आणि तेही निरपेक्ष बुद्धीने ! त्याच्या मनाच्या मोठेपणाबद्दल काय लिहावे ? आणि काय बोलावे ?

म्हणूनच मी वरील निर्णयाला, म्हणजेच नात्यापेक्षा मैत्रीचे बंध हे अतुट असतात, हे अडीअडचणी अधिक सोडवतात, या निष्कर्षाप्रत आलो.



मला असे वाटते किंवा अनुभव आहे की नात्यामुळे मदतीचा एक प्रकारचा हक्क प्राप्त होतो. त्यामुळे मदत घेताना किंवा देताना अहंकार दुःखावला जातो. याउलट मैत्रीचा हक्क हा आपल्या बोलण्या-वागण्यातून, आपण आपल्या अक्कल हुशारीने निर्माण केलेला असल्यामुळे हक्काने मदत मागताना अहंकाराला तडा जात नाही. किल्येक वेळा मदतीची आवश्यकता असताना ती मित्राकडून न घेण्यामुळेच तो दुःखावला, दुरावला जाण्याची शक्यता असते.

पुन्हा नातेवाईक हा केलेल्या मदतीची जाणीव अनेक वेळा पुन्हा पुन्हा करून देत असला म्हणजे मग मदत घेणाऱ्याला 'कुठून मी मदत घेतली, कशाला मी मदत घेतली.' अशी पश्चातापाची पाळीही येते. येथे माझ्या मित्राचे एक उदाहरण देण्यासारखे आहे. त्याने शेकडो मित्रांना सर्व तऱ्हेची मदत केली. अगदी पूर्ण निःस्वार्थ बुद्धीने केली. आणि केलेल्या मदतीचा उल्लेख अनेकांजवळ अनेकवेळा केला आणि त्यामुळे केलेली मदत मातीमोल झाली आणि मैत्रीही तुटली. हे मी पाहिले आहे. म्हणून मी स्वतः एकतर फारशी मदत करतो असे वाटत नाही पण केलीच तर कटाक्षाने उल्लेख टाळतो आणि चुकून उल्लेख झालाच तर मी नामोल्लेख तर नक्कीच टाळतो. हे एवढे चऱ्हाट लिहिण्याचे मुख्य कारण एवढेच की तू स्मरणपूर्वक 'स्व'-रुपवर्धिनीच्या कामाचे मोल आणि मौलिकता लक्षात ठेवून मुद्दाम मदतीसाठी पुण्याला येऊन बावीस हजार बावन्न रुपयांचे जे धन देणगी म्हणून दिलेस त्याबद्दल मी तुझा अत्यंत मनापासून आभारी आहे. परमेश्वर कृपेने तुझ्यासारखे अनेक लोक मदतीला धावल्यामुळेच केवळ हे छोटेसे का होईना काम उभे राहिले. समाजातली दातृत्वबुद्धी ही जागृत असली तरी झाकोळलेली आहे. सचोटीची हाक तिला समजते. तळमळणारे, तडफडणारे मन तिला दिसते. आणि मग अशी ही दातृत्वबुद्धी साद घातली असताना योग्य प्रतिसाद देते आणि त्यामुळेच सुमारे तीस-बत्तीस लाख रुपये समाजाने आपल्याला दिले व एक कणभर काम उभे राहिले.

पुन्हा एकदा तू केलेल्या अर्थसहाय्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद.

घरातील सर्व लहानथोर मंडळींना सप्रेम नमस्कार आणि सर्व गोड लहानग्यांना गोड गोड आशीर्वाद. कळावे,

लोभ नक्कीच आहे, वृद्धीची अपेक्षा आणि आवश्यकताही आहे.

सदैव तुझाच
चिरमंगलाकांक्षी
कृ. ल. पटवर्धन

**नात्यामुळे आकाराला येणाऱ्या मैत्रीपेक्षा, मैत्रीतून फुलणारे नाते किती मोलाचे असते याची प्रचीती अधोरेखित करणारे श्री. रामकृष्ण जोशी यांना लिहिलेले वेगळ्या शैलीतील पत्र**

दि. १३।९।९१

मित्रवर्य गंपूला,

पुणे

स. न. वि. वि.

दि. २१।८।९१ रोजी लिहिलेले पत्र मी श्री. दादा पुणतांबेकर यांच्याकडे दिले होते.

'स्व'-रूपवर्धिनीची तू भेटून गेल्यानंतरची वाटचाल ही समाधानकारकच आहे असे म्हणता येईल. आज आपल्या पाच शाखा असून याशिवाय अनेक नवीन उपक्रम आपल्या वास्तूत चालतात. सर्व उपक्रमात चांगले यश मिळते आहे. त्यामुळे कामाचा उत्साह दुणावतो.

वर्धिनीच्या कामाचा व्याप आता एवढा वाढला आहे की, सध्याच्या ५ मजल्यांची जागा अपूरी पडू लागली आहे. आपल्या वास्तूचा फायदा खालीलप्रमाणे होत आहे.

१) ३५-४० तरुणांची सकाळी व्यायामाची सोय.

२) सुमारे ९० शिशूंची 'पाकोळी' नावाची बालवाडी.

३) महिलांसाठी शिवणवर्ग, गृहशुश्रुषा, भजनवर्ग व मागासवर्गीय जातींच्या उद्योगी महिलांसाठी कर्ज मिळवून देणे इ.

४) ४० मुलांचा 'आजोळ' नावाचा एक आगळा-वेगळा प्रयोग. घरात आई-वडील कामाला गेल्यामुळे शिक्षण व संस्काराअभावी वेड्यावाकड्या वळणाला लागण्याची शक्यता असलेली ५,६, ७ वी तील ही मुले गृहपाठ, संस्कार व इतर अनेक गोष्टी. आपण त्यांना मायेच्या ममतेने शिकवितो तेही अल्पशुल्कातच.

५) उपेक्षित वस्तीतील ८०-९० मुलांची 'समर्थ' रामदास शाखा चालते. यातही शिक्षण, शिस्त, संस्कार हे आहेच.

६) संध्याकाळी १ तासभर २०-२५ मुलांची शिशुशाखा चालते तीही या वास्तूतच.

७) याखेरीज सबंध दिवसभर युवकांना अभ्यासिकेचाही वापर करता येतो.

हे पत्र लिहिण्याचे मुख्य कारण म्हणजे वर्धिनीचे एक कार्यकर्ते डॉ. दादा पुणतांबेकर हे फर्ग्युसन महाविद्यालय येथे कित्येक वर्षे उपप्राचार्य होते. सेवानिवृत्तीनंतर आपले काम त्यांच्या सोयीप्रमाणे करावयाचे असे त्यांनी ठरविले आहे. त्यांची मुलगी खालील पत्त्यावर राहते.

सौ. अनुपमा मनोज भट

295–13 N, WAUKE GAN Rd.,

II 209, Forest Point Appts, Lake Bluff,

Illimois (600044) U.S.A.

हे सर्व कळविण्याचे मुख्य कारण वर्धिनीची प्रयोगशाळा आता ५ वी ते १२ वी पर्यंत १०-१२ मुलांना व्यक्तिगत प्रयोग करता येतील अशी सिद्ध आहे. स्वतः दादा हे भौतिकचे प्रोफेसर होते.



त्यांना मी तिकडील काही वैशिष्ट्यपूर्ण उपकरणे व खेळणी आणायला सांगितली आहेत. ते नोव्हेंबरपर्यंत वरील पत्त्यावर राहणार आहेत. त्यांच्याशी अगर त्यांच्या मुलीशी जर तू संपर्क साधलास तर तुला अधिक खुलासा होऊ शकेल.

मी त्यांना १०,००० रुपयांची खेळणी आणायला सांगितली आहेत. म्हणजे सुमारे ३०-३५ डॉलर्स होतील. तुला शक्य असेल तर हस्ते-परहस्ते एवढे डॉलर्स देणगी म्हणून तू जर देऊ शकलास तर अधिकच उत्तम होईल. एवढे जर तुला जमत नसेल तर ते डॉलर्स तू तेथे खर्च करू शकलास तर त्याचे सममूल्य रुपये मी त्यांच्याकडे पोहोचवू शकेन. सर्व किंवा काही प्रमाणात जर हे डॉलर्स मिळाले तर येथे मुलांच्या शास्त्र शिक्षणाची मोठी सोय होईल. तरी जसे जमेल तसे जास्तीत जास्त सहाय्य करावे ही विनंती. न जमले तर दुःख नाही पण जमले तर उत्तम शिक्षणाचे सुख मिळणार आहे. तरी कसे काय जमते ते कळवावे.

अधिक काय लिहू ? कामाचा आनंद व त्यामुळे आनंदाचे काम चांगले चालू आहे, असे वाटते. मानसिक, शैक्षणिक, संख्यात्मकसुद्धा वर्धिनीची वाटचाल उत्साहाने होत आहे. या महिन्याच्या अखेरीस मी चाळीसगावला वहिनींची भेट घेणार आहे.

दि. २९।८। ला संध्याकाळी श्रीमती वहिनींना चाळीसगावला घरी भेटलो होतो. त्यांची खिन्नता पाहून फार वाईट वाटले. त्या म्हणाल्या, 'किशाभाऊ, किती धक्के सहन करू, आता हे सहन होत नाही.' अणि त्या खरोखरीच डोळ्यांतून पाणी काढू लागल्या. मी तरी त्यांना काय सांगू शकणार ? कारण मी पडलो पुण्यात व येथून काय मी त्यांना कार्यक्रम देणार ? तेथे असतो तर त्यांना मी काहीतरी दिलासा देऊ शकलो असतो पण दुःख करण्यापलीकडे काय करणार ? तू निदान पत्र पाठविण्याची वारंवारिता (Frequency) वाढविलीस, काही थोडासा दिलासा दिलास व त्यांची इच्छा व शक्यता असल्यास त्यांना तू अमेरिकेत घेऊन गेलास तर थोडा दिलासा वाटेल.

कळावे. सर्व थोर मंडळींना स. न. लहानांना गोड आ.

सदैव आपला स्नेहाकांक्षी

कृ. ल. पटवर्धन

शाखेतून जोडल्या गेलेल्या या स्वयंसेवकाशी दोस्ती ही वर्षानुवर्षे तितक्याच ओलाव्याने टिकवून ठेवण्यात कै. किशाभाऊंच्या पत्रांचा फार मोठा वाटा आहे. त्यामुळेच विदेशातील या मित्राला हक्काने संस्थेकरिता काही मागण्यांत कै. किशाभाऊंना संकोच वाटला नाही आणि त्यच वेळेस नाही म्हणण्याचा त्यालाही संकोच वाटू नये याचीही काळजी किती सहजतेने घेतली हे पत्र वाचताना जाणवते

१६ ऑक्टो. ९२
पुणे

मित्रवर्य श्री. वसंतराव यांसी,

स. न. वि. वि.

तू मंत्री झालास त्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन.

एखादा विद्यार्थी उच्च पदावर गेला म्हणजे शिक्षकाला किती आनंद होत असेल हे लिहिणे नको. मी तुझे प्रथम ज्या वेळी वर्तमानपत्रात वृत्त वाचले, तेव्हा मनापासून खूप आनंद झाला. परंतु पत्र लिहिण्याचे कामाच्या गर्दीत राहून गेले, ते आता लिहीत आहे. आपला एक विद्यार्थी 'मंत्री'पदापर्यंत चढू शकतो यापेक्षा आनंद तो कोणता असेल !

**'शिष्यात इच्छेत पराजयम् ।'** असे वचन आहे आणि त्यामुळे माझा पराजय मान्य करण्यात मला आनंदच आहे.

माझ्या कल्पनेप्रमाणे माझी ओळख तू विसरला नसशील असे वाटते. परंतु तुझ्या ध्यानात यावे म्हणून मी माझी ओळख करून देतो. माझे नाव कृ. ल. पटवर्धन, मी 'राजा धनराज गिरजी हायस्कूल'मध्ये सुमारे २८ वर्षे मुख्याध्यापक पदी होतो व तेथेच माझी व तुझी ओळख झाली. त्यानंतर अनेक वेळा 'डेक्कन क्वीन' मध्ये व एकदा घरी येऊन भेटलो होतो. हे तुला आठवत असेल. एवढा परिचय करून देण्याचे कारण तुझ्यामागे कामाचा व्याप व ओळखीच्या माणसांचा दरबार उभा असणार ! त्यातून तुला माझी आठवण करण्यासाठी त्रास होऊ नये म्हणून सविस्तर परिचय करून दिला.

मी तुला 'डेक्कन क्वीन'मध्ये अनेक वेळा 'स्व'-रूपवर्धिनीविषयी सांगितले आहे व माहितीपत्रकेही दिली आहेत. कदाचित तू ती वाचलीही असशीलच.

मी स्वतः १ जानेवारी १९७९ ला शाळेतून मुख्याध्यापक म्हणून निवृत्त झाल्यावर २ जानेवारी १९७९ ला हे काम काम सुरू केले आहे. शाळेत अनेक हुशार विद्यार्थी मी पाहिले परंतु तुझ्यासारखी धमक व हिम्मत धरून सर्वांनाच पुढे जाता येत नाही आणि म्हणून असे हे राष्ट्राचे धन उत्पन्न करणारे महत्त्वाचे स्थान राष्ट्रकारणी लावावे व त्याच बरोबर त्यांच्या व्यक्तिगत विकासाचाही मार्ग मोकळा व्हावा म्हणून गेली १४ वर्षे 'स्व'-रूपवर्धिनीमार्फत या मुलांच्या सर्वांगीण विकासाचा प्रयत्न करत आहे. हे काम मी व आमचे येथील सर्वच कार्यकर्ते पूर्णतः निरपेक्ष बुद्धीने व सेवाभावाने करीत आहोत. येथे अधिक पैशासाठी भांडण नाही तर कमीसाठी आहे. तसेच येथे



प्रसिद्धीची हाव नसून अप्रसिद्धीविषयी गोडी आहे. ह्यामुळे आतापर्यंत संस्थेचा विकास व विस्तार होऊ शकला आहे. कारण सरकारचा गाडा चालवताना स्वच्छ हात, समर्थ खांदे, तल्लख बुद्धी असलेले विशाल मनाचे प्रशासक असणे आवश्यक आहे. ते येथून निर्माण व्हावेत असे मनीचे स्वप्न आहे. त्यादृष्टीने धडपड चालू आहे आणि म्हणूनच सोबत जोडलेल्या अर्जाप्रमाणे तू जर काही साहाय्य करू शकलास तर आनंद वाटेल.

तुझ्या नवीन जबाबदारीत तुला घवघवीत यश प्राप्त व्हावे आणि तुझ्या यशाचा सुगंध सर्वत्र दरवळावा अशी ईश्वरचरणी प्रार्थना करून थांबतो. जे शक्य असेल ते सर्व साहाय्य करावे.

कळावे, लोभ तर आहेच आहे, त्यात वृद्धी व्हावी ही अपेक्षा !

सदैव तुझाच,
स्नेहाकांक्षी
कृ. ल. पटवर्धन

मंत्री म्हणून नियुक्त झालेल्या वसंता चव्हाण या विद्यार्थ्याला अभिनंदनपर पाठवलेल्या या पत्रात वर्धिनी सुरू करण्यामागचा हेतूही स्पष्ट केला आहे आणि त्यागामच्या विचारांची दिशाही.

२४/११/९२

पुणे

परम मित्र संजय नायर यांस

स. न. वि. वि.

तुझे पत्र मिळाले. मजकूर समजला. शब्द आणि शैलीही आवडली. मागील सर्व घटनंचा जणू चित्रपटच तुझ्या डोळ्यांसमोरून सरकला व ते आनंदाचे क्षण तुझ्या डोळ्यांपुढे उभे राहिले याबद्दल मला आनंद आहे. तेथील जीवनसंघर्षाला तोंड देण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक त्या गुणांची जोपासना येथे होऊ शकली याबद्दलही आम्हा सर्वच कार्यकर्त्यांना अतिशय आनंद झालेला आहे. आणि आपली प्रयत्नांची दिशा योग्य आहे हे पूर्वीपेक्षा अधिक जाणवले. दुसरे असेही जाणवते की कॉनव्हेंट शाळेमध्येच जाणाऱ्या विद्यार्थ्याला फाडफाड इंग्रजी बोलता येते व इतरांवर गावठीपणाचा आरोप होतो तेही चूक आहे. मनी मनीषा बाळगली आणि प्रयत्नांची पराकाष्ठा केली तर हृदयातील उर्मीमुळे इंग्रजीवाचून अडत नाही आणि इंग्रजी बोलावयाचेच ठरविले तर प्रभावी बोलता येते.

'सत्यमेव जयते' हे भारताचे बोधवाक्य आहे आणि त्याची रोकडी प्रचिती तू घेतली याचा आनंद कोणाला होणार नाही ? सुदैवाने ह्या गुणांची जोपासना 'स्व'-रूपवर्धिनीसारख्या संस्थेत व्हावी ह्याच उद्देशाने 'स्व'-रूपवर्धिनीची स्थापना झाली आणि सुदैवाने त्याला सुमधूर फळेही आली. तू निर्भय झालास आणि त्यालाही कारण 'स्व'-रूपवर्धिनीतले कार्यक्रम, व्याख्याने असे तू लिहिलेस, यांनीही 'स्व'-रूपवर्धिनीची दिशा अचूक असल्याचे प्रत्ययास आले आणि मन सुखावले. सोबत एका मराठी अहवालाचे इंग्रजी भाषांतर करून पाठविले आहे. तसेच 'स्व'-रूपवर्धिनीमध्ये चाललेल्या प्रकल्पांची माहिती देणारे पत्रक पाठविले आहे. माझ्या माहितीप्रमाणे तुला ही दोन्ही पत्रके पुरेशी होतील असे वाटते.

आता माझ्या प्रकृतीबद्दल म्हणशील तर वयाच्या ७३ व्या वर्षी जेवढे आजार आणि दुःखे जपणे आवश्यक आहे तेवढी सर्व मंडळी शरीरात वस्ती करून अहेत. परंतु त्याचा आपल्या कामावर काही परिणाम होत नाही. आजही मी दिवसातील सामान्यपणे रोज १६-१७ तास काम करू शकतो पण खरे म्हणजे हेही सर्व श्रेय तुम्हा मुलांचेच आहे. त्यातूनही तुझ्यासारखे पत्र आले ना म्हणजे उत्साहाचे इंजेक्शनच मिळाल्यासारखे होते. शारीरिक शक्ती आणि मानसिक शक्ती दुखावते कारण ईप्सित साध्य झाल्याचा आनंद कोणाला होणार नाही ? व्यक्तिगत आयुष्यात तुम्ही पुढे जावे ही वांच्छा आहेच,



परंतु त्याबरोबरच आपल्याचसारख्या अनेक बंधुंना आपण काही सहाय्य करू शकू का ? त्यांच्या दुःखाची बोच आपल्या मनात आहे का ? ही सल जर कायम असेल तर आपल्या सुखाच्या वृद्धीबरोबर दुसऱ्याच्या दुःखाची जाणीवही सतत मनात असते. सावरकरांच्या कवितेत म्हटल्याप्रमाणे ***'तुजसाठी मरण ते जनन । तुजवीण जनन ते मरण'*** एवढा एक विचार मनात प्रभावी ठेवून मनुष्याने सतत पुढे पुढे जाण्याची खटपट जरूर केली पाहिजे आणि आपल्या शक्ती आणि संपत्तीचा उपयोग शक्यतो आपल्या समाजावर उधळला पाहिजे, असे मला वाटते. त्यातून मिळालेला आनंद हा अनुभवानेच कळू शकेल. स्वार्थ कोणाला सुटला नाही, पण मर्यादीत स्वार्थानंतर निःस्वार्थीपणाने आयुष्य जगणे यातही एका अर्थाने स्वार्थच आहे असा उच्च दर्जाचा सात्त्विक स्वार्थ आणि आनंद तुला सतत मिळावा ही परमेश्वराची प्रार्थना.

परममित्र जयूला,

स. न. वि. वि.

तुझे दि. १७.१०.९२ चे पत्र मिळाले. परदेशात असताना तेथील लहानातील लहान खेळणे - बागडणे, दंगामस्ती रुसवे-फुसवे या सर्वांचीच आठवण तुला होते आहे याचा अर्थ येथील हे संस्कार बलवत्तर आहेत. गणपतीचा ताशा तुझा चुकतो आहे आणि त्याची तुला बोच आहे. हेही या आपुलकीचेच लक्षण आहे. नाहीतरी एकूणच माणसांची मानसिकता ही अशी आहे की परदेशात स्वदेशाची आठवण, अनुपस्थितीमुळे मित्रांची आठवण, जागा बदलामुळे मातृभूमीची माया हे सर्व अगदी साहजिक आहे आणि त्यातच आम्हा सर्व तुझ्या मित्रांना आनंद आहे.

तुझ्या पत्रावरून असे दिसते आहे की तुझ्या वर्तनामुळे आपल्या देशाची मान ताठ होईल आणि दुसऱ्याच्या वर्तनामुळे मान खाली घालावी लागते ही जाणही तुझे वर्तन अतिशय चांगले राहील याची खात्री देणारे आहे पण जयू एकंदरीत तुझ्या पत्रावरून तुझ्या वर्तनाची कल्पना आली आणि तुझ्या भावी घवघवीत यशाची जणू प्रचितीच मला त्या पत्रावरून मिळाली.

तुझ्या विचाराची बैठकही पक्की आहे हेही तुझ्या पत्रातील लाल शाईतील मजकूर वाचून पक्के झाले. तुम्हा दोघांनाही येथील समाजात मानमान्यता लाभावी व त्या सर्व प्रतिष्ठेचा उपयोग तेथील भारतीयांच्या आणि येथील गरीबांच्या मदतीसाठी व्हावा असे वाटते. वर्धिनीच्या

प्रगतीचा आलेख तुला सोबत दिलेल्या पत्रावरून दिसेलच. तू पाठविलेले दिवाळी भेटकार्ड आवडले. तुमच्या दोघांचीही प्रकृती ठणठणीत, मने मजबूत, मनगटात शक्ती, हृदयाची विशालता वाढत राहावी एवढी भगवंताची प्रार्थना.

तुम्हा दोघांनाही गोड आशीर्वाद आणि घरच्या सर्व मंडळींना सप्रेम वंदे.

कळावे. लोभ तर नक्कीच आहे. वृद्धीची आवश्यकता आहे.

सदैव तुझाच,
स्नेहाकांक्षी
कृ. ल. पटवर्धन

■ ■

विदेशात असलेल्या संजय नायर व जयप्रकाश नायर या वर्धिनीतील विद्यार्थ्यांनी त्यांच्या 'स्व'-रूपवर्धिनीतील शिकवणुकीचा, संस्कारांचा तेथे कसा उपयोग होतो हे अभिमानाने कळवले. त्यांच्या पत्रांना उत्तर पाठवताना त्यांचे कौतूक तर मनापासून केले आहेच पण आयुष्यात काय विचार करायचा, कसा विचार करायला हवा याचेही सहज मार्गदर्शन केले आहे.



॥ श्री ॥

ता. २० फेब्रु. १९९३

माननीय वि. वा. शिरवाडकर यांसी,

शि. सा. न. वि. वि.

फार लहानपणापासून मी आपल्या काव्यातून स्फूर्ती घेतली आहे. त्या प्रेरणेतूनच 'स्व'-रूपवर्धिनीचे हे एक लहानसे काम सुरू केले आहे. ह्या कामाबद्दल आपणाशी कॅनडातील डॉ. जगन्नाथ वाणी बोलले आहेत असे त्यांनी मला काल फोनवरून सांगितले. आपल्याला या कामात रस आहे असे ते म्हणाले. म्हणून मुद्दाम हे पत्र मी लिहीत आहे. सोबत साहित्य जोडलेच आहे. मुख्यतः यंदाच्या कार्यवृत्ताचे मुखपृष्ठ आपल्या काव्यपंक्तीवर आधारित आहे म्हणून तेही आपल्या अवलोकनार्थ पाठवित आहे.

'स्व'-रूपवर्धिनी म्हणजेच विकास क्षमता असून केवळ सामाजिक किंवा आर्थिक कारणामुळे विकासाची संधी नाही अशी समाजातील हुशार, कर्तबगार आणि धडपडणारी मुले जी देशात धन उत्पन्न करणारी महत्त्वाचे धन आहे. अशांना त्यांच्या सर्वांगाने विकासासाठी संधी उपलब्ध करून द्यावी, असा नम्र प्रयत्न आम्ही करीत आहोत. त्यासंबंधीचा तपशील सोबतच्या साहित्यावरून मिळेलच.

इ. ५ ते ७ वी मधील वरील प्रकारची मुले बुद्धिमापन कसोटीने निवडून त्याच्या मुलाखतीनंतर आपल्या संस्थेत आम्ही घेतो. ती सर्व मुले वेगवेगळ्या शाळा व महाविद्यालयांमधून जातात. त्यात इ. ५ वी पासून ते एम.ए., बी.ई. आणि आय.ए.एस.पर्यंत ही मुले पुढे सरकली आहेत. शाळा–महाविद्यालय सुटल्यानंतर, संध्या ६ ते ९ वा पर्यंतच्या तीन तासांपर्यंत ते आपल्याकडे असतात. त्यांना आपण एकूण १५ विषय शिकवतो व ते सर्व शिक्षण एकही दिवस सुट्टी न घेता ३६५ दिवस. असा हा उपक्रम गेली सुमारे १४ वर्षे चालू आहे. आणि ह्या सर्वाला फक्त मसिक नाममात्र ५० पैसे शुल्क आहे.

ह्याचबरोबर आपल्याकडे महिलांचे व्यवसाय शिक्षण, शिशूंचे शिक्षण आणि संस्कार, दुपारच्या वेळेमध्ये एकटे असलेल्या निराधार मुलांना आधार आणि शिक्षण देणारे आजोळ चालू आहेच. ह्या शिवाय उर्दू शाळेत जाणाऱ्या मुस्लीम मुलींना मराठी शिकवण्याचा तासही चालू असतो. त्यांचासुद्धा यात उत्स्फूर्तपणे सहभाग असतो. इत्यादी अनेक समाजपयोगी पूर्णतः निःस्वार्थपणे हे काम करावे अशी प्रतिज्ञा व प्रयत्न आहे.

सोबत पाठविलेल्या साहित्यासंबंधी आपले समर्थ मार्गदर्शन व अभिप्राय कळाला तर मी आपला आभारी होईन. तसेच पुण्याला

आपण मुद्दाम येवून वर्धिनीला भेट दिलीत तर फारच आनंद होईल व आम्हा सर्व कार्यकर्त्यांना आपले समर्थ मार्गदर्शन मिळेल. तरी येण्याची कृपा करावी ही नम्र विनंती.

कळावे, लोभ असावा.

सदैव आपला स्नेहाकांक्षी
कृ. ल. पटवर्धन

■ ■

डॉ. जगन्नाथ वाणी हे कॅनडात राहतात व तेथून महाराष्ट्र सेवा समिती ऑर्गनायझेशन या संस्थेच्या माध्यमातून भारतातील अनेक संस्थांना सहाय्य करतात. वर्धिनीशी त्यांचे असेच स्नेहसंबंध आहेत. त्यांनी कै. वि. वा. शिरवाडकरांना वर्धिनीच्या प्रकल्पाविषयी सांगितले. संबंधांचा तो धागा अधिक घट्ट विणण्यातील एक प्रयत्न म्हणून हे पत्र मोलाचे.



श्री. वामनराव अभ्यंकर यांसी,

स. न. वि. वि.

आपल्या विद्यालयाच्या घवघवीत यशाबद्दलचे वर्णन घडविणारे पत्र मिळाले. आपल्या बऱ्याच वर्षाच्या तपश्चर्येला आज मधुर, गोड, रसाळ, फळे येताना पाहिल्याने खूप आनंद वाटला. आपल्या विद्यालयातील मुलांनी स्पृहणीय यश प्राप्त करून शाळेच्या परंपरेत अजूनच भर टाकली आहे. त्यांच्या कष्टाची ही सुरेख फळे दिसत आहेत. त्यांच्या यशाचे कौतुक करण्यासारखेच आहे.

***'कर्तव्य पाळता पार दरवळो यशाचा गंध'***

या चरणाच्या उदाहरणाचे प्रत्यक्ष दर्शन आपण आम्हाला घडविले आहे. त्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

'गुरु तसे शिष्य' अशी म्हण मराठीत आहे. त्यामुळे शिष्याच्या प्रत्येक यशामागे गुरू हा असतोच. तसेच बी पेरल्या शिवाय वृक्ष उगवत नाही व फळेही येत नाहीत.

बी पेरण्याचे महत्त्वाचे काम आपण केलेले आहे. पण बी पेरल्यावर आलेल्या रोपट्याची जोपासना करणाऱ्या माळ्याचेही तेवढेच कौतुक असते. कारण रोज पाणी घालणे, खते घालणे, कीड लागू नये म्हणून औषध घालणे, हेही तितकेच महत्त्वाचे काम आहे. तेव्हाच कुठे ती 'बी' वृक्ष म्हणून जगन्मान्य पावते. त्या माळ्याचीही भूमिका बजावून आपण बी चे वृक्षात रूपांतर केले. त्यामुळे आपलेही मनःपूर्वक अभिनंदन.

आपली ही परंपरा अशीच चालू राहू देत व विद्यालयाची उत्तरोत्तर प्रगती होवो, ही सदिच्छा !

कळावे,

आपला स्नेहाकांक्षी
कृ. ल. पटवर्धन

श्री. वामनराव अभ्यंकर
ज्ञानप्रबोधिनी, नवनगर विद्यालय
प्राधिकरण, निगडी, पुणे - ४११०४४

■ ■

श्री. वामनराव अभ्यंकर व कै. किशाभाऊ पटवर्धन हे 'शिक्षणातील नव्या नव्या प्रयोगांच्या' माध्यमातून जोडले गेलेले स्नेही. ज्ञानप्रबोधिनीच्या माध्यमातून दोघांनी एकत्र काम केले आणि पुढे वेगळ्या वाटांवर नव्याने काम उभेही केले. कुठेही असले तरी एकमेकांना सतत प्रोत्साहन देण्यातील त्यांची सहजता अनेकांना प्रेरित करणारी आहे.

मा. डॉ. बी. एस्. जोशी १।७।९४
डी२, १५०, साऊथ लंपकीन स्ट्रीट
अथेन्स्, जी ए ३०६०५
यू एस ए

स. न. वि. वि.

डॉ. घारपुरे यांच्या सांगण्यावरून मी आपणाला हे पत्र लिहीत आहे. आपण त्यांना लिहिलेले पत्र मिळाल्यानंतर त्यांनी मला तुम्हाला पत्र लिहिण्यास सांगितले. त्यालाही आता बरेच दिवस झाले आहेत. परंतु येथील कामाच्या गडबडीमुळे व येथील सर्वच कार्यकर्ते विविध कामात सध्या गर्क असल्यामुळे निर्णय घेण्यास वेळ लागला. त्यामुळे झालेल्या विलंबास आपण उदार मनाने क्षमा करावी, ही नम्र विनंती.

प्रथमच, आपण जो 'स्व'-रूपवर्धिनीच्या कामावर विश्वास दर्शवून सशर्त सुमारे एक लाख देण्याचा जो विचार करीत आहात, त्याबद्दल मी आपला मनःपूर्वक आभारी आहे.

'स्व'-रूपवर्धिनीचे माहितीपत्रक व इतर काही साहित्य पाठविले आहे, त्यावरून आपल्याला येथील कामाची कल्पना येईलच.

'स्व'-रूपवर्धिनी ही संस्था धर्मादाय आयुक्तांकडे नोंदविलेली आहे. त्यामुळे आम्हास त्यांच्या मार्गदर्शक नियमांप्रमाणे काम करणे भाग आहे. त्या नियमांनुसार व आमच्या लेखापालांच्या (Auditor) सुचनेनुसार 'स्व'-रूपवर्धिनीस कोणाला कर्ज देता येत नाही. फक्त विद्यावेतन (Scholership) देता येते. त्यामुळे आपली इच्छा असूनसुद्धा आम्हाला कोणाही विद्यार्थ्याला, आपले पैसे घेऊन कर्ज देता येणार नाही.

परंतु आपला त्यामागील शुद्ध भाव हा मात्र नक्कीच अनुकरणीय आहे. त्यासाठी मी आपल्याला खालीलप्रमाणे काही योजना सुचवू इच्छितो.

१) आपले पैसे हे धर्मादाय आयुक्तांनी परवानगी दिलेल्या योजनेत गुंतवावे व त्यातून येणारे वार्षिक उत्पन्न हे विद्यावेतन म्हणून द्यावे.

२) वरील गुंतवणुकीतून जे वार्षिक उत्पन्न येईल ते सर्वच्या सर्व विद्यावेतन म्हणून न देता त्यापैकी ७५ टक्के विद्यावेतन म्हणून द्यावे व उरलेल्यापैकी उत्पन्नाचे २० टक्के मूळ रकमेत जमा करावे व राहिलेले ५ टक्के प्रशासकीय व इतर कामासाठी वापरावे.

३) जे विद्यावेतन दिले जाईल त्याची वसुली करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे आणि हे पैसे समाजाचे असून ते समाजास परत करणे आवश्यक आहे याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजवावी, अशा पद्धतीचे काम 'स्व'-रूपवर्धिनी गेली सुमारे १६ वर्षे सतत करीत आहे आणि त्याचा अनुभव फारच चांगला आहे. तरीही विद्यार्थ्यांकडून काही लेखी स्वरूपात करारासारखे करून घेता येईल.

मी आपणाला अशी विनंती करतो की, येथील प्रचलित



कायद्याच्या आणि सामाजिक मानसिकतेच्या अनुभवावरून वरील योजना अधिक व्यवहार्य असून ती आपणास मान्य असल्यास व इच्छा असल्यास आपण हे पैसे 'स्व'-रूपवर्धिनीकडे द्यावे.

मी आपणास अशी खात्री देतो की, या पैशाचा गैरवापर होणार नाहीच, परंतु त्याचा योग्य विनियोग होऊन अनेक होतकरू, हुशार व गरीब विद्यार्थ्यांना ह्याचा फारच उपयोग होईल. तसेच या पैशांच्या वसुलीसाठी आम्ही प्रयत्नशील राहून शिकस्तीची खटपट करू.

सामान्यपणे ५० टक्के किंवा त्याहून थोडे अधिक टक्के विद्यार्थ्यांकडून हे पैसे निश्चित वसूल होतील असे मला वाटते.

कायदेशीरपणे, काही कागदपत्रे करून घेवून, मी वर म्हटल्याप्रमाणे आमच्यासारख्या धर्मादाय संस्थांना कर्ज देता येतच नाही. परंतु समजा देता येत असले तरी, येथे न्यायनिवाडा होण्यास लागणारा वेळ, खर्च आणि शक्ती ही न परवडणारी बाब आहे, कारण न्यायालयात अगदी न्याय्य बाब असली तरीही पैसे कोर्टाने वसूल करणे हे महाकर्मकठीण आहे. शिवाय संस्थेच्या हातात वसूल झालेले पैसे मिळेपर्यंत झारीतच पुष्कळ शुक्राचार्य बसलेले आहेत. त्यामुळे माझ्या मताप्रमाणे पैसे घेणाऱ्या मुलांची पैसे परत करण्यासाठी मानसिक तयारी करून त्याला प्रेरित करणे हा एकमेव मार्ग आहे. 'स्व'-रूपवर्धिनीचा ह्या बाबतीत अनुभव फार चांगला आहे. तेव्हा आपली इच्छा असेल तसे करावे.

सोबत पाठविलेले 'स्व'-रूपवर्धिनीचे साहित्य सोयीसवडीने नजरेखालून घालावे आणि आपण जर येथे आलात तर 'स्व'-रूपवर्धिनी पाहण्यासाठी थोडा वेळ काढावा, ही नम्र विनंती. कळावे.

लोभ तर आहेच आहे. वृद्धीची अपेक्षा नि आवश्यकताही आहे.

आपला सदैव चिरमंगलाकांक्षी,
कृ. ल. पटवर्धन

सार्वजनिक न्यासांचा संसार समाजाकडून, दातृत्वशाली व्यक्तींकडून मिळणाऱ्या देणग्यांवरच चालतो हे खरे असले तरी देणगीचा स्वीकार करताना देणगी देणाऱ्या व्यक्तींच्या कल्पना आणि संस्थेचे ध्येय / उद्दिष्ट, संस्था संचालनाचे नियम यात विसंगती असून चालत नाही. देणगी देणाऱ्यांच्या इच्छेचा आदर करतानाच काही महत्त्वाच्या गोष्टी स्पष्टपणाने व्यक्त कराव्या लागतात. डॉ. सी. एस. जोशी हे अमेरिकेत असतात व त्यांच्या देणगीतून वर्धिनीत विद्यावेतनाची योजना सुरू झाली व त्यात मोठ्या रकमेची भरही त्यांनी घातली. पण योजना सुरू करताना भूमिका स्पष्ट केल्यामुळे पुढे या योजनेत कोणतीही अडचण आली नाही.

२६।१२।९४

पुणे

मा. श्री. यशवंतराव यांसी,

स. न. वि. वि.

आपल्या पत्राने अहंकार नक्कीच सुखावला. परंतु खरे म्हणजे ज्या संत तुकारामांच्या नखाची किंवा केसाची सरही मला नाही, ते संत तुकारामही म्हणतात, ***"मज पामरासी काय थोरपण !"*** आणि अशा या तुकारामांच्या उक्तीला साक्ष ठेवून मी जर हुरळून गेलो तर लोक निदान तोंडावर नाही तरी मनातल्या मनात 'हा बाबा काय शेखी मिरवतोय ? काय मोठं कर्तृत्व आहे ?' असं म्हणतील. व्यवहारी जगात असे म्हणणे भागही असते म्हणा !

निदान माझ्या सारख्याने तरी हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. शिवाय ही सर्व स्तुतीची हवा डोक्यात गेली आणि विमान उडायला लागले तर उडणाऱ्या विमानातून खाली येण्यासाठी हातात छत्री हवी. म्हणजे पाय जमिनीवर टेकता येतात.

तुकाराममहाराज असंही म्हणाल्याचं वाचलंय की,

***'पूज्य झालो, अंगा झाला अभिमान ।***
***पुढील कारण खोळंबले !...'***

एवढ्यासाठीसुद्धा हातात छत्री हवी असे मला वाटते. आणि म्हणूनच समाजामध्ये जशी विमानाच्या शोधाची आवश्यकता आहे. तशीच जरूरी विमानातून खाली उडी मारण्यासाठी छत्री शोधण्याची सुद्धा आहे. आशावादी विमान उडवतो. निराशावादी छत्री धरतो. कार्याचे विमान उडण्यासाठी आशावाद हवाच - परंतु निराशावादी छत्री पेलण्याची ताकदही सतत हवी.

हिन्दुस्थानच्या सुरक्षिततेसाठी, समृद्धीसाठी आणि सर्वांगीण उन्नतीसाठी सर्वस्वार्पण करणाऱ्यांपैकी मी एक असावं, ही तुमची सार्थ अपेक्षा मला कळली.

माझ्या परीने अल्प-स्वल्प काही काम करता आले. तसा थोडाफार प्रयत्नही केला. हेही खरे पण यातही प्रबोधकांचा आणि त्यातल्या त्यात यशवंतरावांचा सिंहाचा वाटा अमान्य करण्यासारखा नाही. आजपर्यंत जे काही थोडेफार काम झाले यापेक्षा कैक पटीने कामाचे डोंगर पडले आहेत.



त्यापैकी काही थोडेसे काम माझ्या हातून परमेश्वराने करून घ्यावे व आपल्यासारख्यांच्या सदिच्छेनेच ते करण्याची शक्ती लाभावी हीच त्या जगन्नियंत्याची प्रार्थना.

कळावे,

आपला,

कृ. ल. पटवर्धन

ज्ञानप्रबोधिनीच्या कार्यातील सहकारी श्री. यशवंतराव लेले यांनी केलेल्या अभिनंदनाला प्रतिसाद म्हणून लिहिलेल्या या पत्राची शैली कै. किशाभाऊंची श्री. यशवंतराव यांच्याशी असलेल्या मैत्रीची कल्पना स्पष्ट करते. प्रत्यक्ष भेटीत ज्या प्रकारे संवादात सहजता असते, तशाच धाटणीत लिहिलेल्या पत्राचा हा एक नमुना.

१६ ऑगस्ट १९९६
पुणे

प्रांजली व मनिषा यांना,

तुमचे ३०/७ चे पत्र ११ ऑगस्टला मिळाले. त्याचप्रमाणे तुमचा साष्टांग नमस्कारही मिळाला. इतक्या लांबून केलेला असल्याने लोटांगणासाखाच मला वाटला.

मोठा प्रोजेक्ट हाती घेतलास हे वाचून अत्यंत, अत्यंत आनंद झाला. हाती घेतलेले काम तडीस नेणे हे तुम्हा दोघींचे खास वैशिष्ट्य मला दिसते आहे. मनिषाने आईला लिहिलेल्या पत्रातला मजकूर वाचूनही मनात आनंदाचा डोंब उसळला. खूप खूप आनंद झाला. गणिताच्या माध्यमातून वाटचाल करून वर्धिनीप्रमाणेच ध्येयधुंद तरुण-तरुणी निर्माण करण्याची कामगिरी तुम्ही कराल याबद्दल मला पूर्ण विश्वास आलाय. तुझे आशावादी पत्र वाचून कोणाला आनंद होणार नाही ? भाषा भिन्न, संस्कृती भिन्न, सामाजिक मानसिकता भिन्न, शिक्षणाचा ढाचा भिन्न आणि ह्या सर्वांवर मात करून भिन्न प्रकारचे काम उभे करायला लागणारी माणसेही भिन्न आणि धुंद असावी लागतात. 'स्व'-रूपवर्धिनीच्या माध्यमातून असे युवक-युवती निर्माण व्हावेत हा आपणा सर्वांनाच छाती फुगवून टाकणारा अभिमानाचा विषय आहे.

***''इवलेसे रोप लावियले द्वारी, तयाचा वेलू गेला पूर्वांचली''***

त्याचप्रमाणे 'स्व'-रुपवर्धिनीची मूळ कल्पनाही शिकवताना ध्यानात ठेवून त्याचप्रमाणे शिकवण्याचे धोरण तू ठेवलेस हे मला फार आवडले. कारण आजच्या शाळेत मूलभूत कल्पना (Basic Concepts) शिकवायला शिक्षकांना सवडही नसते अन् आवडही नसते. त्या मूलभूत कल्पना एकदा तू पक्क्या करून घेतल्यास म्हणजे परसेंटेजमध्येही फरक पडणारच. त्याचबरोबर शिक्षणाला तू खेळही जोडलेस हे तर फारच छान. शाळेतून शिकून मुले कंटाळलेली असतातच. त्यांना घाम येईपर्यंत खेळवणे, त्यानंतर ती ताजी-तवानी होणे व अभ्यासासाठी मनोभूमी तयार होणे हेही तत्त्व फारच चांगले आहे.

तू जे लिहिलयंस की, 'भय्या' नी 'दिदि' करत मुले काही विचारायला लागली की खूप आनंद होतो हे वाचून पुन्हःप्रत्ययाचा आनंद झाला. मात्र घरी संपर्क असल्याशिवाय आपल्याला मूल वाचता येत नाही, कळंत नाही. त्याच्या घरची परिस्थिती अडचणी लक्षात येत नाहीत म्हणून दिवसातून काही वेळ तरी त्यांचे घरी जाणे हे नक्कीच फायद्याचे ठरेल. त्याचप्रमाणे त्यांच्या मधल्या सुट्टीच्या वेळात तेथील शाळांना जर चालत असेल तर त्यावेळात आपण मुलांना भेटायला गेलो तर मुले खुश असतात. त्याचाही आपल्या कामाला चांगला फायदा होतो. कार्यकर्ते मिळवण्यातही तुमचा हातखंडा



दिसतोय आणि भाग्यही भले वाटते आहे. आपल्या कामाबद्दल समाजात गवगवां होणे ही आपल्या यशाची पावतीच म्हटली पाहिजे.

तुमच्यानंतर काम करणारे युवक-युवती कोणीतरी मिळावेत असा सतत ध्यास येथील कार्यकर्त्यांमध्ये आहे. त्यासाठी दि. १० व ११ ऑगस्ट हे दोन दिवस माननीय भास्करराव वर्धिनीत येऊन राहिले होते. त्यांचेबरोबर पूर्वी रामकृष्ण मिशनचे काम करणारं संन्यासी स्वामी असिमानंदही दोन दिवस होते. त्यांचेही भाषण युवती विभागात अत्यंत सुंदर झाले. सर्व शाखांची एकत्रित रविवारची मानसिक विकास बैठक मा. भास्करराव व स्वामी असिमानंदांनी घेतली. त्यांची भोजनव्यवस्था प्रशांत वेदपाठक व लता टिळेकर यांच्या घरी केली होती, तर चहापानाची व्यवस्था तेजश्री शेंड्येकडे केली होती. तसेच तुझ्या व मनिषाच्या घरी सदिच्छा भेटही झाली. तुमच्याइतकेच तीव्रतेने आम्हा सर्वांच्याच मनात तुम्हाला खो घ्यायला भिडू - मिळावा अशी धडपड चालू आहे. पण त्याहीपेक्षा सांगायचे झाले तर तुम्हाला खो घायला किंवा 'पर्याय' म्हणून नव्हे तर 'सहायक' असे कोणीतरी यावे अशी इच्छा आहे. म्हणजे अधिक गतीने काम होऊ शकेल.

मा. भास्कररावांच्या सांगीप्रमाणे लोहित जिल्ह्याची जवाबदारी 'स्व'-रुपवर्धिनीने घ्यावी. निदान त्यांच्या शब्दासाठी तरी आम्ही ती जबाबदारी स्विकारावी असे मला वाटते. आणि कोणीना कोणी तेथे कामाला यावे असे शिकस्तीचे प्रयत्न करीत आहोत.

कळावे.

तेथील सर्व कार्यकर्त्यांना व नवीन मित्र-मैत्रिणींना सप्रेम नमस्कार. सर्व लहान बाल-गोपालांना आशीर्वाद. लोभ तर आहेच आहे. वृद्धीची अपेक्षा व आवश्यकताही आहे.

आपला,
चिरमंगलाकांक्षी,
कृ. ल. पटवर्धन
(कार्याध्यक्ष)

**वर्धिनीच्या संस्कारातून कु. प्रांजली लकडे. कु. मनिषा बोईन या युवती आपले शिक्षण पूर्ण झाल्यानंतर घरच्यांचा आशीर्वाद घेऊन हजारो मैल दूर असलेल्या अरूणाचल प्रदेशात वनवासी बांधवांची सेवा करायला गेल्या. त्यांनी दोन वर्षे तेथे काम केले. त्यांच्याप्रमाणेच कु. मंगला कुंडलिंगार व कु. रोहिणी तेंडूलकर यांनी दोन-दोन वर्षे तेथे काम करून आल्या. प्रांजली व मनिषा यांनी चालवलेल्या कामाचे मनापासून वाटणारे कौतूक तर पत्रातून उमटले आहेच पण त्याच बरोबरीने काम यशस्वी होण्यासाठी आवश्यक दिशादर्शन हीसुद्धा या पत्राची विशेषता आहे.**

दि. २६/१२/९६
पुणे

मित्रवर्य नारायण यांस

स.न.वि.वि.,

तुझ्या मुलाच्या लग्नाचे स्मरणपूर्वक पाठवलेले निमंत्रण मिळाले. अतितीव्र इच्छा असूनदेखील मला त्याचा लाभ घेता आला नाही, याचे अत्यंत दुःख आहे. पण या दुःखापेक्षा माझ्या घरी फारच मोठे दुःख आहे, हे तुला माहीत आहे. मी सर्व तयारी येण्यासाठी केली असतानाच आणि तेसुद्धा आधी सर्व ठरवून, मनाचे समाधान करून तुझ्याकडील लग्नाला यायचे असे मी ठरविले होते. पण नेमके त्याच वेळी सौ. लीलाची तब्येत फारच बिघडली. आणि त्याचवेळी मी बोलावलेले तीन डॉक्टर तिला तपासायला आले होते. त्यांची आपसात तिच्या तब्येतीसंबंधी चर्चा चालू होती. तुला कदाचित खोटे वाटेल परंतु त्याहीवेळात सतत दहा-पाच वेळा तरी तुझ्याकडील लग्नाची आठवण होत होती. केवळ नाईलाजाने मी देहाने तेथे येऊ शकलो नाही, तरी त्या शुभमंगलाचे शुभचिंतन मी येथून मनाने सतत करतच होतो. आणि यापेक्षा अधिक मी काही करू शकत नव्हतो, याचेही वाईट वाटले. तरी ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन माझ्या तेथील अनुपस्थितीबद्दल तू मला मोठ्या मनाने क्षमा करावी अशी विनंती आहे.

हा समारंभ नेटका, देखणा, भव्य आणि अविस्मरणीय झाला असेल याबद्दल माझ्या मनात मुळीच शंका नाही. तुझा मित्रपरिवार आणि कुटुंबपरिवार एवढा मोठा आहे की, कुठल्याच कामाला हात कमी पडले नसतील अशी माझी खात्री आहे. सुदैवाने इतरही सुखसंपदा तुझ्यापाशी पुष्कळच आहेत. हे सर्व पाहता माझी व सौ. लीलाची आठवण ठेऊन तू पत्रिका पाठवलीस हा तुझ्या मनाचा मोठेपणा आहे, असे मला वाटते. एकतर मी वयाने मोठा व पेशाने शिक्षक आणि तू शिष्य यापेक्षा कुठल्याही परिस्थितीत मी फार थिटा आहे, खुजा आहे. याची मला पूर्ण जाण आहे. मी माझे असे भाग्य समजतो की, मला असे तुझ्यासारखे सर्व बाबतीत श्रेष्ठ अनेक शिष्य मिळाले आणि माझ्या गुणांपेक्षा त्यांच्या मनाच्या मोठेपणामुळे ते मला अजूनही मोठा मानतात, मित्र समजतात.

नूतन विवाहीत दांपत्यास माझ्या आणि सौ. लीलाच्या त्यांच्या दीर्घायुष्याच्या भरभराटीबद्दल मनापासून शुभेच्छा व परमेश्वराची प्रार्थना.

पत्राला वेळ झाला. पण परिस्थिती वेळ मानत नाही. शुभमुहूर्त



जाणत नाही आणि त्यामुळे आपल्या सर्व कामना पूर्ण होत नाहीत. तरी या पत्रोत्तराला झालेल्या उशीराबद्दलही मी दिलगीर आहे. कळावे, लोभ आणि प्रेम तर आहेच आहे पण दोन्हीच्याही वृद्धीची अपेक्षा आणि आवश्यकताही आहे.

जाता जाता एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे की, तू अगदी योग्य समयी योग्य असे स्टूल पाठविलेस; त्याचा उपयोग सौ. लीलाला भरपूर झाला. समयोचित सहाय्याबद्दल आभार मानून दुरावा उत्पन्न करण्यापेक्षा कृतज्ञता व्यक्त करून त्या तुझ्या भाराखाली राहणे आणि जवळीक कायम ठेवणे हे मला अधिक पसंत आहे.

सदैव तुझाच
चिरमंगलकांक्षी,
कृ. ल. पटवर्धन

■ ■

**शाळेत विद्यार्थी या नात्याने संपर्कात आलेल्यांशी कै. किशाभाऊंचे किती आत्मियतेचे संबंध होते. मित्रत्वाचे नाते होते, याची प्रचीती देणारे हे पत्र. असे शेकडो मित्र ही त्यांची खरी संपत्ती होती.**

श्रीमान अभय फिरोदिया यांसी

स.न.वि.वि.

'स्व'-रूपवर्धिनीचे स्वरुप आपणाला माहीत आहेच. कै. बाबांनी या कामासाठी किमान ७ लाख रु. ची मदत वेळोवेळी केलेली आहे. तेही अनेक वेळा 'स्व'-रूपवर्धिनीत येऊन गेलेले आहेत. ''स्व'-रूपवर्धिनीची मुलेही आपल्याकडे बाबांशी गप्पा मारण्यासाठी आलेली आहेत. आणि त्यांनी मोठ्या आनंदाने स्वागत करून मुलांशी मनमोकळी चर्चाही केलेली आहे. हे सर्व लिहिण्याचे मुख्य कारण असे की, बाबा संस्था आणि व्यक्तींचे बाबतीत एवढे चोखंदळ असताना 'स्व'-रूपवर्धिनीला मदत करताना त्यांनी केव्हाही आखडता हात घेतला नाही. एकदा तर ते मला असे म्हणाले होते की, ''भविष्य काळात राळेगण सिंदी व 'स्व'-रूपवर्धिनी हीच देशाला आशेची स्थाने आहेत.'', इतका 'स्व'-रुपवर्धिनीच्या कामावर व कार्यकर्त्यांवर त्यांचा गाढा विश्वास होता. 'स्व'-रूपवर्धिनीच्या कामाचे आजचे स्वरुप, हालचाली व स्थिती ही सोबत दिलेल्या सर्व अहवालावरून आपल्याला कळेलच ! एका वाक्यात मी एवढेच म्हणेन की, खूप समाधान व आनंद वाटावा अशी कामाची प्रगती आहे.

खरे सांगायचे तर माझ्या मते 'मनुष्य' निर्मितीचे काम फार महत्त्वाचे व मोलाचे आहे. हे काम अत्यंत मौलीक व मूलभूत आहे, असा माझा समज आहे व ते केल्याशिवाय आपल्या समाजाचा व पर्यायाने देशाचा कोणताही प्रश्न सुटणार नाही. वास्तविक जे काम देशाच्या शिक्षण पद्धतीतून व्हायला पाहिजे, जे काम इतर देशात सहजपणे होऊ शकते ते काम दुर्दैवाने सरकारी मदत घेऊन चालणाऱ्या शाळांमधून होऊ शकत नाही, असे आपण पाहतो. मी तर त्याचा सुमारे अठ्ठावीस वर्षे अनुभव घेतला आहे आणि त्या एका वेदनेतूनच सेवानिवृत्ती नंतर दुसऱ्या दिवशी मी या कामाला हात घातला. १२ मुलांनी सुरू केलेले हे काम आज दिसा मासाने फुलत आहे. देशाची भौतिक प्रगती खूप झाली पण कोण्या एका कवीने म्हटल्याप्रमाणे

***''कर्तव्याची जाणिव नसता । प्रगतीला ही अर्थ नसे ॥''***

याचीच सतत जाणीव ठेऊन 'स्व'-रूपवर्धिनी गेली २० वर्षे काम करीत आहे. प्रगतीचा सूर्य मध्यान्ही आला असे म्हणण्याचे धाडस कुणीच करू शकत नाही. परंतु झुंजू-मुंजू झालेले आहे पहाट नक्की होणार आहे. सूर्य हळुहळु वर येणार आहे आणि मध्यान्हीकडे नक्कीच झुकणार आहे.

कामात अडथळे पुष्कळ आले व येणार आहेत पण पूजनीय डॉ. हेगडेवार यांनी दिलेल्या शिकवणीप्रमाणे आम्ही अडचणींवर मात करू. आशीर्वाद, मार्गदर्शन व मदत आपल्या सारख्यांकडून व्हायला हवी. ती आपण कराल याबद्दल मला खात्री आहे.



'स्व'-रूपवर्धिनीचे काम सरकारी मदती शिवाय करायचे असे पहिल्या दिवसापासून ठरवले आहे. कारण स्वच्छ हाताचे, समर्थ खांद्याचे, तल्लख बुद्धीचे व विशाल मनाचे तरतरीत तरुण तयार करण्याचे काम सरकारी मदतीने होणार नाही हे मी अनुभवले आहे. आणि माझ्यापेक्षा आपल्याला नक्कीच जास्त अनुभवायला मिळाले असेल ! कारण समाजाची मानसिकताच जनहिताकडे अगर देश कल्याणाकडे स्वार्थासाठी दुर्लक्ष करणे अशी आहे. आणि ह्या रोगावर झाला तर उपयोग 'स्व'-रूपवर्धिनीच्या कामाचा औषधासारखा होईल असे वाटते. किंबहुना त्यासाठीच 'स्व'रूपवर्धिनीचा जन्म झाला आहे. 'स्व'-रूपवर्धिनीचा सध्या दरमहा खर्च रुपये ८५,००० इतका आहे. यापैकी कायम ठेवीतून दरमहा व्याजाने ४५ ते ५० हजार रु. मिळतात. उरलेला सर्व पैसा हा ट्रस्ट, उदार देणगीदार व जाहिराती यांच्याच उत्पन्नातून उभा करावा असे ठरविले आहे आणि तो तसाच गोळा केला पाहिजे असा बाणा आहे. कारण खर्चाला लागणाऱ्या पैशापेक्षा जादा पैसा संस्थेत गोळा झाला म्हणजे ती संस्था न रहाता तिचे संस्थान होते.

म्हणून आपणाला नम्र विनंती अशी आहे की, आपण आपल्या या कामाची मौलीकता, मोल, महत्त्व जाणून कै. बाबांसारखीच शक्य तेवढी शिकस्तीची मदत आपल्या हाती असलेल्या ट्रस्टमधून करावी.

आपल्याकडील थोर मंडळींना सप्रेम नमस्कार.

लहानांस गोड आशीर्वाद.

कळावे,

सदैव आपला<br>
स्नेहांकाक्षी व चिरमंगलाकांक्षी<br>
कृ. ल. पटवर्धन<br>
कार्याध्यक्ष

श्री. अभय फिरोदिया हे पुण्यातील एक प्रतिथयश उद्योगपती. त्यांचे वडील कै. नवलमन फिरोदिया यांनी वर्धिनीला सहाय्य तर केले होतेच पण वर्धिनीच्या कामाबद्दल विश्वासही प्रकट केला होता. तोच विश्वासाचा आणि सहाय्याचा धागा पुढे विणण्याचा प्रयत्न म्हणजे हे पत्र आहे. आपण काय काम करतो आहोत ? त्या मागची भूमिका काय, कार्यपद्धती कोणती आहे व हे सारे प्रयत्न यशस्वी होण्यासाठी कशा स्वरूपाची मदत हवी आहे, हे नेमकेपणानं मांडण्याचं कसब कै. किशाभाऊंकडे होते. याच आधारावर उद्योगक्षेत्रातील अशी मोठी माणसे वर्धिनीच्या जवळ आली.

दि. ८।२।२००१

आदरणीय सौ. जयश्रीताई यांसी,

स. न. वि. वि.,

उशीरा का होईना परंतु कर्तृत्वाला मान मिळाला. कळकळीचे फळ मिळाले. प्राविण्याचे चीज झाले. वास्तविक कुठल्याच पद, प्रतिष्ठेचा अडथळा तुम्हाला अडवू शकला नाही. कारण सर्व परिस्थितीवर मात करून, स्वतःच्या हिंमतीने, बुद्धिकौशल्याने आणि चतुराईने तुम्ही शाळेचे नाव पुण्यात सतत गाजत ठेवले. विशेषतः शाळांच्या खेळसृष्टीत नाव मिळाले, याचा तुम्हाइतकाच कै. लिलाला व मलाही अभिमान होता, आहे व राहील.

तुम्हाला कदाचित अतिशयोक्ती वाटेल परंतु तुमचे व्यक्तिमत्त्वच विद्यार्थिनींना आकर्षित करू शकते. तुमच्या स्वभावातील गोडवा, खेळातील चापल्य हे असे काही मुलखावेगळे आहे की, जे कोणी नाकारू शकले नाही. या आपल्या सर्व कौशल्याचा हेवा कदाचित काही सहकाऱ्यांनी केला असेल व त्याचा मानसिक त्रास तुम्हाला झालाही असेल. कारण असा त्रास मला झाला आहे. तुम्हास असा त्रास झाला नसेल तर तुम्ही भाग्यवानच असे म्हटले पाहिजे. मी शाळेत मुख्याध्यापक असताना गीतरामायणातील एक वचन ठसठशीत अक्षरात टेबलावर काचेखाली ठेवले होते. त्याचा फायदा मला झाला. ते वचन होते, ***'भोग सुखाचा अखंड घेई । मनीं राही निष्काम ॥'***

याचा फायदा तुम्हासही होईल असा माझा कयास आहे. अनुभव म्हणून एक गोष्ट लिहितो, शाळेतील माझे शत्रू क्रमांक एक यांनीसुद्धा या वचनाचे कौतुक केले व त्यांचा विरोध थोडा बोथट झाला. अशा वागण्यामुळे नुकसान तर काहीच होत नाही पण फायदा मात्र जरूर होतो असा माझा माफक अनुभव आहे.

म्या पामरे अधिक काय लिहावे ? तुकाराम महाराज सुद्धा म्हणतात, ***'मज पामरा ते काय थोरपण'*** किंवा माऊली लिहितात, ***तरी न्युन ते पुरते । अधिक ते सरते । करोनिया घ्यावे ते तुमते ॥ विनवितु असे ॥***

आपल्या नवीन पदोन्नतीबद्दल मनापासून त्रिवार अभिनंदन !

कृपालोभ असावा, नव्हे तो वाढावा ही नम्र विनंती.

सदैव आपला

यशाकांक्षी व चिरमंगलाकांक्षी

श्री. कृ. ल. पटवर्धन

पदोन्नतीबद्दल अभिनंदन करतानाच अशा पदांवर गेल्यावर येणाऱ्या संभाव्य अडचणींवर मात कशी करता येते याबाबत स्वतःचा अनुभव या पत्रात व्यक्त झाला आहे. गीत रामायणातील गीतांच्या ध्वनिमुद्रिका ऐकणं हा किशाभाऊंचा आवडता छंद. या गीतातील विचार किशाभाऊ व्यवहारातही कसे उपयोगी करून घेत होते याची अनुभूती देणारे हे पत्र.



खरं म्हणजे तेथे माझी शरीराने उपस्थिती आवश्यक; मान्य. पण आता तेथे येवून अभिनंदन करण्याची शारीरिक शक्ती कमी झाल्यामुळे आणि आता मी 'स्व-'रुपवर्धिनीच्या कामातूनसुद्धा सेवानिवृत्त झाल्यामुळे कमीत कमी वेळा घराच्या बाहेर पडतो आणि एवढ्या लांब तर नाहीच.

तेव्हा तुमच्या नेहमीच्या उदार स्वभावाप्रमाणे माझ्या अनुपस्थितीची मला क्षमा करावी, ही नम्र विनंती. कळावे, लोभ तर नक्कीच आहे. वृद्धीची अपेक्षा आणि आवश्यकताही आहे.

सदैव आपला

चिरमंगलकांक्षी व स्नेहाकांक्षी

कृष्णराव पटवर्धन

'स्व'-रूपवर्धिनीचे काम ज्या जेष्ठ सहकाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून, मार्गदर्शनातून उभे राहिले त्यापैकी प्राचार्य श्री. वामनराव अभ्यंकर हे एक. त्यांनी शून्यातून उभ्या केलेल्या निगडीच्या ज्ञानप्रबोधिनी, या संस्थेच्या नवनगर विद्यालय, निगडीच्या द्विदशकपूर्तीच्या निमित्ताने होणाऱ्या कार्यक्रमाला शुभेच्छा व्यक्त करणारे पत्र.

माझ्या बोलण्याचालण्यात काही चुकभूल झाली असेल तर त्याची मोठ्या मनाने क्षमा करावी ही नम्र विनंती, कळावे.

लोभ आणि प्रेम नक्कीच आहे, वृद्धीची अपेक्षा आणि आवश्यकताही आहे.

सदैव आपला

चिरमंगल कांक्षी व स्नेहकांक्षी

श्री. कृ. ल. पटवर्धन

श्री. गिरीशराव प्रभुणे यांनी सर्वस्व ओतून फासेपारधी मुलामुलींसाठी उभ्या केलेल्या यमगरवाडी येथील प्रकल्पाविषयी कै. किशाभाऊंच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. शक्य असेल ती सर्व मदत या कामाला झाली पाहिजे यासाठी ते धडपडत. प्रसंगी वर्धिनीला मिळू शकणारी एखादी देणगी या प्रकल्पाला देण्याची विनंती ते सहजपणाने करू शकत होते. कारण असा प्रकल्प यशस्वी होणं हे देशाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे अशी त्यांची पक्की धारणा होती. श्री. गिरीशराव यांनीसुद्धा त्यांचे अलिकडे प्रसिद्ध झालेले 'पारधी' हे पुस्तक ज्यांना समर्पित केले आहे त्यात कै. किशाभाऊंचेही नाव आहे. कारण एकच, एकमेकांना एकमेकांच्या कामाविषयी वाटणारा अकृत्रिम जिव्हाळा



दिनांक : २०/६/०९

पुणे

मा. श्री. वामनराव यांसी,

सप्रेम नमस्कार वि. वि. आपले आपल्या विद्यालयाच्या द्विदशकपूर्ती समारंभाचे निमंत्रण कालच रात्री मिळाले. 'छप्पर फाडके' असा काय तरी दूरदर्शनवर कार्यक्रम कोणच्या तरी वाहिनीवर होतो असे मी ऐकलेला आहे. तो दूरदर्शवरचा कार्यक्रम काहीही असो पण माझ्यासमोर 'छप्पर फाडके' यश वामनरावांनी गेल्या २० वर्षात मिळवले आहे याचा मी साक्षीदार आहे.

मी जेव्हा वामनराव म्हणतो त्या वेळेला वामनराव आणि त्यांचा सर्व समूह असा त्यात अंर्तभाव आहे. वामनराव यांच्याबद्दल नुसताच आदर नाही तर 'वामनराव' हे नाव आता बहुवचनी झालेलं आहे, असे मला वाटते. अशा माझ्या यशस्वी मित्राला एवढे धो धो यश आणि तेही फक्त २० वर्षात मिळाले हे काही कोण्या 'येरा गबाळ्याचे' काम नाही. ह्याला खांदे समर्थ लागतात, मन विशाल लागते. बुद्धीला तल्लखपणा असावा लागतो आणि ह्या सर्वांपेक्षा हात स्वच्छ व निर्मळ असावे लागतात. किंबहुना हे यश म्हणजे या चार गुणांचे निदर्शकच आहेत.

'धन्य धन्य वामनराव, धन्य धन्य ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय, धन्य ते सहकारी आणि धन्य तो सगळा ताफा', असा सुरेख, सुमधुर संगम जमल्याशिवाय इतकं सुरेल संगीत पिंपरी-चिंचवड परिसरात घुमणार नाही.

शैक्षणिक प्रयोग, शैक्षणिक प्रयोगातील अनुकरणीय नावीन्य, कलेच्या अभ्यासाच्या क्षेत्रात आणि खेळात देखील नेत्रदीपक यश हेही काही असामान्यच वाटते. विवेकानंदांच्या शब्दांत निःस्वार्थपणाला फळे येतात. आणि जरी ती गोड असली तरी त्याला धीर धरावा लागतो. आपल्यापाशी तो उदंड आहे याची मला पूर्ण जाण आहे आणि त्याचीच ही रोकडी प्रचीती आहे.

आपले कौतुक करावे तेवढे थोडेच. कितीही अभिनंदन करून देखील ते अपुरेच होईल असे मला वाटते, एवढे मोठे यश आपण संपादिले आहे. तुमच्या विनयशील स्वभावामुळे तुमचा अभिमान किंवा अहंकार जरी नसला आणि तुम्ही बोलून दाखवला नाही हे तुमचे मोठेपण. मला मात्र तुमचा अभिमान वाटावा असा हा पराक्रम आहे.

अधिक काय लिहू ? अभिनंदन ! अभिनंदन ! अभिनंदन !! अनेकवार अमर्याद अभिनंदन !!!

आपल्या सर्व समारंभाला माझ्या अक्षरशः अनेक अनेक शुभेच्छा.

दि. १६।२।०१
पुणे

आदरणीय मित्रवर्य श्री. गिरीशराव यांसी,

स.न.वि.वि.

आपले एकदा सोडून दोनदा स्नेहमेळाव्याचे निमंत्रण मिळाले. तुमच्या समारंभाच्या धवधवीत यशासाठी दणदणीत शुभेच्छा.

पण तुम्हाला माहीतच आहे की, यमगरवाडी येथे जाण्या-येण्याचा प्रवासाचा त्रास प्रकृतीला झेपत नाही.

त्यामुळे जबरी इच्छा असूनसुद्धा मला यमगरवाडीला येता येत नाही याचे दुःख आहे.

भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानच्या कामाविषयी मला ते काम समजल्यापासून त्याचे महत्त्व, मोल, आणि मौलिकता माझ्या लक्षात आलेली आहे.

या कामाकडे केवळ सामाजिक समरसता एवढ्या एकाच दृष्टिकोनातून मी पाहात नाही. ह्या कामाचे मोल त्याहूनही अधिक आहे हेही मी जाणतो.

हळूहळू हा पराक्रम समाजातून कमी कमी होत असावा किंवा असेल तर त्याची रोकडी प्रचिती युद्धभूमीशिवाय सामान्य नागरी जीवनात कमी आढळते असे मला वाटते. त्यामुळे रोजचे कोणतेही वर्तमानपत्र उघडले म्हणजे कोठेवाडीसारखे अत्याचार, अनाचार, भ्रष्टाचार आढळतात.

त्यादृष्टीने फासेपारधी समाजाकडे पाहिले आणि त्यांच्या उन्नतीकडे पाहून त्यांना योग्य दिशा दिली तर ते लोकच समाजाला वरील दोषांपासून मुक्त करतील.

गुणांचा उपयोग देशकारणी व्हावा हे लिहिणे जितके सोपे त्याच्या अनंत पट तसे घडविणे अवघड आहे. या सर्व दृष्टीने विचार केल्यावर तुम्ही तसे घडविण्यासाठी कैक वर्षे तहानभूक विसरून जे अपरंपार कष्ट, धडपड, पायपीट करून काम उभे केले आहे ते मुलखावेगळे तर आहेच आहे, पण त्याहीपेक्षा एक उत्तम आदर्श नमुना सबंध देशापुढे ठेवण्याचे सामर्थ्य या प्रकल्पात आहे.

म्हणूनच कोणत्याही प्रकारची मदत मला करणे शक्य होते ते करण्याचा मी माझ्या कुवतीप्रमाणे अल्पस्वल्प प्रयत्न केला. तशीच मदत ह्यापुढेही करीन एवढे आश्वासन देतो.



२३.७.२००१
पुणे

आदरणीय श्रीमती भारतीताई यांना,

स. न. वि. वि.

आपले पत्र दोन दिवसांपूर्वीच मिळाले. स्मरणपूर्वक अगत्याने आणि आपुलकीपोटी जे आपण अभिनंदन केलेत, त्या आपुलकीला कमीपणा येऊ नये म्हणून सध्यातरी आभार न मानता भार ठेवून कृतज्ञतेवरच भागवतो. पण कृतज्ञता ही न मानणे यामुळे कृतघ्नतेचाही वास येण्याची शक्यता.

'माणसाने केलेल्या कोणत्याही कार्यात अनेक छोट्या-मोठ्यांचे, ज्ञात-अज्ञातांचे आपपल्या परीने हात लागत असतात.' कदाचित असे हातदेखील त्यांच्या दृष्टीने कृतज्ञतेचे असू शकतील. कृतज्ञतेचा दीप आपल्या अंतःकरणात सतत तेवत ठेवणे हे संबंधित कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचे परमपवित्र कर्तव्य असते. असे कार्य करणाऱ्याच्या अंतःकरणात ज्यावेळी कृतज्ञता वास करीत असते तेव्हा ते कार्य भगवान श्रीकृष्णासाठी असते. कार्य झाल्यावर जोपर्यंत कृतज्ञतेची भावना अंतःकरणात उसळून वर येत नाही तोपर्यंत ते कार्य अपूर्णच असते. ज्यावेळी कृतज्ञता निर्माण होते व ती प्रगट होते तोच त्या कार्याचा पूर्णविराम असतो.

या विवेचनावरून आपल्या लक्षात येईल की 'स्व'-रूपवर्धिनीचे 'बहु-आयामी' काम हे काही माझे एकट्याचे श्रेय नाही. सामुदायिक यशामध्ये माझाही एक छोटा वाटा आहे, एवढे फार तर म्हणता येईल आणि म्हणून मिळालेले अनेक पुरस्कार व मिळणारा पुरस्कारही हे माझे व्यक्तीचे कौतुक नसून ते कामाचे कौतुक झाले ह्यात मला नक्कीच आनंद आहे आणि ह्याची जाण मी सतत ठेवली पाहिजे नाहीतर एकदा ह्या अहंकाराच्या हवेने विमान उडायला लागले म्हणजे जर पॅराशूट हातात नसेल तर शक्य आहे की जरा अपघातच जास्त होण्याचा धोका आहे. म्हणून परिस्थितीचे भान ठेवून ज्ञानेश्वरांच्या ओवीमध्ये म्हटल्याप्रमाणे –

***परि हे तुमचेनि झाले । म्या हे नाही केले । धर्म किर्तन सिद्धी गेले । तुम्हा कारणे ॥***

ज्ञानेश्वर माऊलीसुद्धा जर सबंध ज्ञानेश्वरी लिहिल्यानंतर स्वतःकडे कुठल्याही प्रकारचे श्रेय घेत नाहीत तर 'म्या पामरे' सर्व श्रेय कसे घेऊ ?

पुन्हा एकदा आपल्या सर्व स्त्री शक्ती जागरणाच्या कार्यकर्त्यांना शुभेच्छेबद्दल आणि अभिनंदनाबद्दल 'कृतज्ञ' व सप्रेम वन्दे.

सदैव आपला चिरमंगलकांक्षी,
कृ. ल. पटवर्धन

मिळालेल्या पुरस्काराकडे, सन्मानाकडे पहाणेची
कै. किशाभाऊंची दृष्टी स्पष्ट करणारे पत्र

दि. : २९।९।०१
पुणे

मित्रवर्य माधवला स. न. वि. वि.

तसे पाहिले तर हे पत्र कदाचित तुला अनपेक्षित असेल. परंतु बरेच दिवसांत गाठभेट नाही. व फोन व पत्रही नाही म्हणून हे पत्रप्रयोजन.

अर्थात मी तरी 'स्व'-रूपवर्धिनीशिवाय दुसरे काय लिहिणार ? अणि असेही आहे की तुझी माझ्याकडून वर्धिनीशिवाय आणखी कशाची अपेक्षा असणार ? सबब वर्धिनी.

एक काल ऐसा होता की तू अत्यंत उत्कृष्ट काम करीत होतास ह्याची साक्ष श्रीमती पुष्पाताई नडे देऊ शकतात. मिलिंदबद्दल तर बोलायलाच नको. तुम्ही दोघेही बंधू म्हणजे कामाची ओढ असलेले असे तळमळीचे लोक होता हे 'स्व'-रूपवर्धिनीतल्या आपल्या अनेक मित्रांना माहीत आहे.

तळहाताला रक्त येईपर्यंत काचेचा ठोकळा घासून त्याला अंतर्गोल मिलिंदाने केला. असे एक नाही दोन ठोकळे त्याने केले. ते त्याने मला दाखविले आणि त्याच्यातून उत्तम उपयुक्त अशी एक दुर्बिण (Reflecting Teliscope) तयार केली. त्यातून ग्रहताऱ्यांचे दर्शन वर्धिनीतील अनेक मुलांना मिलिंदने दाखवले आणि पुढे तो रामकृष्ण मिशन मध्ये गेला. तेथेही त्याने छानच नाव कमावले, असे मला कळले. पहाटेपासून रात्रीपर्यंत अखंड चिकाटीने परिश्रम करून साधना करीत असतो. तेथे त्याचे सध्या प्रशिक्षण चालू आहे, शक्य आहे की पुढील काही काळात तो 'स्वामी' होईल आणि असे त्याचे उज्ज्वल भविष्य आणि चरित्र माझ्या डोळ्यांसमोर दिसते आहे. त्यानी जो मार्ग पत्करला आहे तो एकदम उच्च, साधारण माणसाला असाध्य आहे. त्यामुळे मला त्याच्या एकूणच जीवनशैलीबद्दल आदर आहे. वरील सर्व विवेचन आणि आठवण होण्याचे कारण कालच माझ्यासाठी रामकृष्ण मिशनमधून वर्धिनीत फोन आला होता, 'तुम्हाला हवी असलेली मिलिंदाने तयार केलेली दुर्बीण रामकृष्ण मिशनमध्ये सापडली आहे, ती तुम्ही घेऊन जा.' आज उद्याकडे वर्धिनीत मुले ती आणतीलही.

ह्या कारणामुळे मी तुला हे पत्र लिहीत आहे. आता थोडी वर्धिनीच्या आर्थिक विषयासंबंधी – सरकारी मदतीशिवाय आणि बँकेच्या कर्जाव्यतिरिक्त वर्धिनीचा खर्च मासिक लाख-सव्वा लाख रुपयांचा आहे. मुलांकडून केवळ घेतलेल्या ५ रु. शुल्कात भागणार नाही हे समजण्याइतके व्यावहारिक चातुर्य तुझ्याकडे नक्कीच आहे.



कारण सरकारी मदतीने हे काम करणे शक्य नाही, याची तुला जाण आहे. म्हणून तुझ्यासारख्या सुहृदयांना मदतीसाठी साद घालणे हा एकमेव मार्ग शिल्लक आहे. आजच्या आर्थिक मंदीमुळे आवक कमी आणि महागाईमुळे जावक जास्त. शिवाय काम थांबविणे योग्य नाही, शक्यही नाही. सबब तुला जे जेवढे शक्य असेल ते आणि काही मित्रांना, नातेवाईकांना सांगून शक्यतेप्रमाणे सहजासहजी जमेल ते आर्थिक सहाय्य करावे. आपले काम मूलभूत, मौलिक आहे हे तुला लिहिणे न लगे. आपले हात स्वच्छ आहेत याचा तुला अनुभव आहे. या कामात कुणाचाही कसलाही स्वार्थ नाही याचीही तुला कल्पना आहे. पण हे काम झाल्याशिवाय आणि केल्याशिवाय आपली ही मायभू सुजलाम् सुफलाम् होणार नाही हेही तुला कळले आहे. सबब मदतीची हाक.

कळावे, घरातील सर्व थोरांना सप्रेम नमस्कार, लहानांना गोड आशीर्वाद.

लोभ तर नक्कीच आहे, वृद्धीची अपेक्षा आणि आवश्यकताही आहे.

सदैव आपला
चिरमंगलकांक्षी आणि स्नेहाकांक्षी,
कृ. ल. पटवर्धन

वर्धिनीचा वर्धक मिलींद पुरोहित अवकाश दर्शन दुर्बीण यातील तज्ज्ञ. पुढे त्याने रामकृष्ण मठामध्ये पूर्ण वेळ काम करीत संन्यास स्वीकारला. स्वामी विभूआनंद असे नाम ग्रहण केल्यानंतर आजही त्यांचा वर्धिनीशी संपर्क आहे. त्यांचा जुळाभाऊ माधव यास लिहिलेले हे पत्र.

दि. : ९।१२।०१

मित्रवर्य सद्भाऊ साठे यांसी,

स. न. वि. वि.

एवढा प्रचंड आजार कित्येक वर्षे जो जपून तू ठेवला आहेस आणि तरीही हसतखेळत सामाजिक जाण ठेवून त्याला मदत करण्याची तुझी बुद्धी ही काही औरच म्हटली पाहिजे. दुखणी-खुपणी सर्वांनाच कमी-अधिक प्रमाणात होत असतात पण त्या सर्वांवर मात करण्याचा तुझा मार्ग जरा मुलखावेगळाच आहे. रामदास म्हणतात,

**'दुसऱ्याच्या दुःखे दुःख व्हावे । परसंतोषी सुखी असावे ।**
**प्राणीमात्रास मेळवोनि घ्यावे । बऱ्या शब्दे ॥'**

ह्या तुझ्या वृत्तीमुळेच गुडघे साथ देत नसतानासुद्धा तू चालू शकतोस, बोलायला त्रास होत असताना तू बोलू शकतोस आणि या युक्तीने तू स्वतःचे दुःख विसरू शकतोस आणि दुसऱ्याला मदत करू शकतोस आणि दुसऱ्याचे सुख वाढवण्यासाठी मदत करतोस आणि त्या मदतीबद्दलच मी आभार मानतो. रक्कम किती लहान अगर किती मोठी हा मुद्दा मोलाचा नाही पण त्यामागे असलेल्या तुळशीपत्राच्या तुझ्या भावनेचे मोल करण्यासारखे नाही असे मला वाटते.

मला वाटते तुम्ही दोघांनी ही दुःखामधून सुखाची वाट काढली आहे. हे सोपे नाही. वरच्या दर्जाचीच मानसिकता अशासाठी असावी लागते, तेव्हाच हे जमते. काही मानसिक अध्यात्माची बैठक अशी प्रवृत्ती निर्माण होण्यासाठी आवश्यक असते. विचाराची घनता असावी लागते, मनाचे मोठेपण टिकवावे लागते आणि बुद्धीचा समतोल राखावा लागतो. हे तू जे साध्य केले आहेस त्यात माझ्यासारख्याला ग्राह्य भाग पुष्कळच आहे. घेण्याचा प्रयत्न करीन. परमेश्वराशी अशी प्रार्थना करीन की ही प्रवृत्ती, हे औदार्य असेच आमच्या 'सदू'मध्ये टिकावे.

कळावे, सौ. वहिनींना व घरच्या सर्व थोर मंडळींना सप्रेम नमस्कार. लहानांना गोड आशीर्वाद.

लोभ नक्कीच आहे, वृद्धीची अपेक्षा आणि आवश्यकताही आहे.

सदैव आपला

चिरमंगलकांक्षी आणि स्नेहाकांक्षी,

कृ. ल. पटवर्धन

प्रकृती साथ देत नसताना आणि सोबतीला कोणी साक्षीदार नसतानाही डोंबिवली येथे 'स्व'-रूपवर्धिनीसारखा शैक्षणिक प्रयोग स्वतः करून पाहणाऱ्या व 'स्व'-रूपवर्धिनीला आर्थिक सहाय्य पाठविणाऱ्या या स्नेह्याला लिहिलेले हे पत्र माणसं जोडून ठेवण्याच्या कलेतील कै. किशाभाऊंचे कौशल्य लक्षात आणून देते.



दि. : २५।१२।०१
पुणे

परममित्र श्री. विलासराव चाफेकर यांसी,

स. न. वि.वि. दि. १३ नोव्हें. २००१ च्या सकाळच्या अंकात 'परिवर्तनाच्या चळवळीला नवी दिशा देणारे चाफेकर' हा लेख वाचला. आणि तुझ्या चळवळीतील धोडदौड चहुदिशांनी चौखूर चालू आहे हे वाचून आणि प्रगती पाहून अत्यंत आनंद झाला. 'वंचित विकास' असो किंवा 'जाणीव' संघटनेचे काम असो, त्या चळवळीतील तुझी पहिलीच पाऊले आहेत आणि तिथपासुन त्या चळवळीत अग्रगण्य राहून, तू काम करून घवघवीत यश संपादन करतोस हे कौतुकास्पद आहे. पण तिथेच तुझी प्रतिभा कुठे थांबली आहे ? देवदासींच्या मुलांसाठी वसतिगृहे आणि दवाखाने, हातगाडीवाले आणि पथारीवाले यांच्या प्रश्नांसाठी लढा, एकूणच काय दुर्लक्षित घटकांकडे खास लक्ष देऊन त्यांच्या अडचणी सोडवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून ठेवण्यासाठी चाललेली तुझी धडपड ही निश्चितच शाबासकी देण्यासारखीच आहे. त्या लेखात केलेले तुझे वर्णन 'समाज परिवर्तनाच्या चळवळीसाठी झटणारा दीपस्तंभ' ही बिरुदावली तुला चपखल बसण्यासारखी आहे. आणि तेही पुन्हा कुठल्याही तऱ्हेची प्रसिद्धीची हाव न धरता रामदासांच्या शब्दांत

**'विरक्ते उपाधी करावी । आणि उदासवृत्ति न सांडावी ॥**
**नाना सामर्थ्य वाढवावी । वैराग्यबळे ॥'**

किरकोळ काम करून 'कम काम ज्यादा प्रसिद्धी' अशी मनीषा बाळगणारे अनेक पण विलास चाफेकर हा जरा दुर्मिळच.

शिवाय स्वच्छ हाताने, समर्थ खांद्याने, विशाल मनाने आणि तल्लख बुद्धीने हा जो कामाचा आपण वटवृक्ष उभा केला आहे त्याच्या फांद्या आणि पारंब्या महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यात आणि मध्यप्रदेशातदेखील पसरल्या आणि तेथे नवीन धुमारे फुटून विविध प्रकल्प सुरू झाले. एखादे काम मनावर घेतले म्हणजे ते यशस्वी होईपर्यंत झटत राहायचे आणि यश मिळाल्याशिवाय थबकायचे नाही. 'गरिबांची कणव, वंचितांचा विकास' ह्या गोष्टी मंत्र्यापासून संत्र्यापर्यंत अनेकजण बोलतात पण त्यामागे स्वार्थाची बारीकशी ज्योत हृदयात मिणमिणत असते. आपले काम आणि वृत्ती जरा मुलखावेगळीच म्हणावी लागेल. मुंबईपासून मध्यप्रदेशापर्यंत अनेक दिशांनी, अनेक प्रकारांनी, विविध स्तरांत ज्या चळवळी आपण उभ्या केल्या आहेत, त्या अगदी दुर्मिळ आणि नवीन तर आहेतच पण त्यासाठी झटणारे, धडपड करणारे असे कार्यकर्ते आपण खडे केलेत हे तर आणखीनच दुर्मिळ.

'बचेंगे तो और भी लढेंगे' ह्या बाण्याने अनेक आजारांशी

झगडत आणि हातातल्या कामाची तलवार न सोडता त्या आजाराचा पाडाव करून जे यश तुम्ही हाती घेतलेल्या कार्यात मिळविले आहे ते स्पृहणीय आहे. तुम्ही करीत असलेल्या जनसेवेच्या ह्या झाडाला एकच प्रकारची नाही तर अनेक प्रकारची फळे-फुले येऊन वृक्ष बहरलेला डौलाने डोलताना दिसतो आहे. वसतिगृह चालवण्यापासून रोजंदारीसाठी शिक्षण आणि रोजगार मिळवून देण्यापर्यंत आरोग्य, सेवा व सल्ला इ. अनेक आयाम त्याला जोडलेले दिसतात. 'सबला महिला केंद्र' हे एक आणखीनच नवीन प्रकरण पण ह्या सर्वांचा लाभार्थी एकच, तो म्हणजे उपेक्षित, दुर्लक्षित गरीब आणि विकासाची संधी नसलेली अशी मंडळी आणि त्यातही पुन्हा त्यांच्यासाठी आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञान केंद्राचा उपक्रम आहेच. ग्रामीण विकासाचे ही वावडे दिसत नाही. तेथेही प्रकल्प आहेतच. शेतीतही रूची दिसतेच आहे. आणि या सर्वांना चेतना मिळावी म्हणून कर्जाचा पुरवठा असावा ह्यासाठी सहकारी पतसंस्थासुद्धा आर्थिक आधारासाठी उभी आहे.

माझा मात्र अनुभव असा आहे की, 'चांगला हेतू आणि अचूक मार्ग असला म्हणजे सत्कर्म' असते. आणि सत्कर्मासाठी स्वच्छ हात, मधे कुठेही नळाला छिद्रामुळे प्रवाह खंडीत नाही अशी व्यवस्था असली की पैसे कमी पडत नाहीत हे आपण दाखवून दिले आहे. त्यासाठी समाजाचा मुबलक विश्वास तुम्ही संपादन केलेला आहे. एकूणच काय टागोरांच्या शब्दांत असे म्हणता येईल की, "Wherefrom far and near arrival Salutation, To which I join my own."

कळावे, लोभ तर नक्की आहेच आहे. पत्र लिहिण्यास उशीराची क्षमा असावी. 'पण सत्कर्माला कधी उशीर होत नाही असे म्हणतात.' या वचनाचा आधार घेऊन उशीर झाला तरी पत्र लिहिले आहे, कृपया स्वीकार असावा.

तुझ्या सर्व सहकार्यांना आणि सर्व कार्यकर्त्यांना तुझ्याप्रमाणे त्यांनाही सर्वांच्या कार्याकडे पाहून साष्टांग नमस्कार.

सदैव आपला
चिरमंगलाकांक्षी आणि स्नेहाकांक्षी,
कृ. ल. पटवर्धन

■ ■

क्षेत्र कोणतेही असो, विचारधारा कोणतीही असो, सामाजिक क्षेत्रात झोकून देऊन काम करणाऱ्या कार्यकर्त्यांबद्दल कै. किशाभाऊंच्या मनात असा आरदयुक्त भाव असायचा



२६।१२।०१
पुणे

परममित्र चि. अवधूत यास आशीर्वाद.

सकाळच्या दि. २५ डिसें. अंकात तुझी पितृछाया हरपली हे वाचून खूप वाईट वाटले. कलावंत म्हणून त्यांचा डिम् डिम् खूपच गाजत व वाजत होता. सर्वदूर त्यांची वाहवा होत होती. त्यांना मागणीही खूप होती. असेही म्हणता येण्यासारखे की व्यक्तीचित्रे आणि तीही तैलरंगात काढायचे तर काढावीत ती फडणीसांनीच !

शिक्षक, कलावंत, ज्ञानप्रबोधिनी, 'स्व'-रूपवर्धिनी, कलाध्यापक संघ, मॉडर्न विद्यालय इ. संस्थांशी त्यांची पुष्कळच जवळीक होती. अक्कलकोटचे देवस्थानचे संग्रहालय तर त्यांनीच बांधले. सेंट मीरा हायस्कूलच्या कलादालनाच्या उभारणीतही त्यांनी मजबूत मेहनत घेतली. पुरस्काराची उधळण व पखरण अशा माणसांवर न झाली तर नवलच. आदर्श शिक्षक, अनेक दैनिकातले लेख ही भूषणे त्यांनी भूषविली. "पुत्र असावा ऐसा गुंडा ज्याचा तिन्ही लोकी झेंडा" असेही कलेचे वंशसातत्य नुकतेच टिकवणे नव्हे तर वर्धिनीसारखे तू वाढवत नेले आहेस हा योग जरा दुर्मिळच. सर्व विपरीत परिस्थितीवर मात करून तू तुझ्या व्यवसायात, कलेत तुझ्या लहान वयात मिळवलेले नाव व श्रेय तुझ्या कल्पकतेला जितके आहे तितकेच आर्थिक धाडसालाही द्यावे लागेल. 'Not Faliure but low aim is crime' 'बचेंगे तो और भी लढेंगे' ह्या बाण्यामुळे तू आजपर्यंत धडाधड पुढे गेलासच पण ह्यापुढेही कोणतेही अपयश तुला मागे खेचू शकणार नाही, याची मला पूर्ण खात्री आहे. एक कारण असेही असू शकेल की, तुझी झेप उत्तम, सर्वोत्तम, सर्वोत्कृष्ट संपादन केल्याशिवाय थकणारी नाही. चिकाटीला कमी नाही आणि हाताला दम नाही असा प्रवास असल्यावर अपयश कोठून येणार ? म्हणून वडिलांचे छत्र हरपले ह्यांनी दमछाक होणारा गडी तू नव्हेस. त्यांच्याइतकाच मलाही तुझ्याबद्दल अभिमान आहे आणि अनुकरण करावे असे तुझे व्यक्तिमत्त्व आहे. एका कवीने म्हटले आहे,

***'जे टाळणे अशक्य ।***
***दे शक्ती ते सहाय्या ॥***
***जे शक्य साध्य आहे ।***
***निर्धार ते कराया ॥***
***मज काय शक्य आहे ।***
***माझे मला कळाया ॥***
***दे बुद्धि देवराया, दे बुद्धि देवराया ॥।'***

झगडत आणि हातातल्या कामाची तलवार न सोडता त्या आजाराचा पाडाव करून जे यश तुम्ही हाती घेतलेल्या कार्यात मिळविले आहे ते स्पृहणीय आहे. तुम्ही करीत असलेल्या जनसेवेच्या ह्या झाडाला एकच प्रकारची नाही तर अनेक प्रकारची फळे-फुले येऊन वृक्ष बहरलेला डौलाने डोलताना दिसतो आहे. वसतिगृह चालवण्यापासून रोजंदारीसाठी शिक्षण आणि रोजगार मिळवून देण्यापर्यंत आरोग्य, सेवा व सल्ला इ. अनेक आयाम त्याला जोडलेले दिसतात. 'सबला महिला केंद्र' हे एक आणखीनच नवीन प्रकरण पण ह्या सर्वांचा लाभार्थी एकच, तो म्हणजे उपेक्षित, दुर्लक्षित गरीब आणि विकासाची संधी नसलेली अशी मंडळी आणि त्यातही पुन्हा त्यांच्यासाठी आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञान केंद्राचा उपक्रम आहेच. ग्रामीण विकासाचे ही वावडे दिसत नाही. तेथेही प्रकल्प आहेतच. शेतीतही रूची दिसतेच आहे. आणि या सर्वांना चेतना मिळावी म्हणून कर्जाचा पुरवठा असावा ह्यासाठी सहकारी पतसंस्थासुद्धा आर्थिक आधारासाठी उभी आहे.

माझा मात्र अनुभव असा आहे की, 'चांगला हेतू आणि अचूक मार्ग असला म्हणजे सत्कर्म' असते. आणि सत्कर्मासाठी स्वच्छ हात, मधे कुठेही नळाला छिद्रामुळे प्रवाह खंडीत नाही अशी व्यवस्था असली की पैसे कमी पडत नाहीत हे आपण दाखवून दिले आहे. त्यासाठी समाजाचा मुबलक विश्वास तुम्ही संपादन केलेला आहे. एकूणच काय टागोरांच्या शब्दांत असे म्हणता येईल की, "Wherefrom far and near arrival Salutation, To which I join my own."

कळावे, लोभ तर नक्की आहेच आहे. पत्र लिहिण्यास उशीराची क्षमा असावी. 'पण सत्कर्माला कधी उशीर होत नाही असे म्हणतात.' या वचनाचा आधार घेऊन उशीर झाला तरी पत्र लिहिले आहे, कृपया स्वीकार असावा.

तुझ्या सर्व सहकार्यांना आणि सर्व कार्यकर्त्यांना तुझ्याप्रमाणे त्यांनाही सर्वांच्या कार्याकडे पाहून साष्टांग नमस्कार.

सदैव आपला
चिरमंगलाकांक्षी आणि स्नेहाकांक्षी,
कृ. ल. पटवर्धन

■ ■

क्षेत्र कोणतेही असो, विचारधारा कोणतीही असो, सामाजिक क्षेत्रात झोकून देऊन काम करणाऱ्या कार्यकर्त्यांबद्दल कै. किशाभाऊंच्या मनात असा आरदयुक्त भाव असायचा



२६।१२।०१
पुणे

परममित्र चि. अवधूत यास आशीर्वाद.

सकाळच्या दि. २५ डिसें. अंकात तुझी पितृछाया हरपली हे वाचून खूप वाईट वाटले. कलावंत म्हणून त्यांचा डिम् डिम् खूपच गाजत व वाजत होता. सर्वदूर त्यांची वाहवा होत होती. त्यांना मागणीही खूप होती. असेही म्हणता येण्यासारखे की व्यक्तीचित्रे आणि तीही तैलरंगात काढायचे तर काढावीत ती फडणीसांनीच !

शिक्षक, कलावंत, ज्ञानप्रबोधिनी, 'स्व'-रूपवर्धिनी, कलाध्यापक संघ, मॉडर्न विद्यालय इ. संस्थांशी त्यांची पुष्कळच जवळीक होती. अक्कलकोटचे देवस्थानचे संग्रहालय तर त्यांनीच बांधले. सेंट मीरा हायस्कूलच्या कलादालनाच्या उभारणीतही त्यांनी मजबूत मेहनत घेतली. पुरस्काराची उधळण व पखरण अशा माणसांवर न झाली तर नवलच. आदर्श शिक्षक, अनेक दैनिकातले लेख ही भूषणे त्यांनी भूषविली. "पुत्र असावा ऐसा गुंडा ज्याचा तिन्ही लोकी झेंडा" असेही कलेचे वंशसातत्य नुकतेच टिकवणे नव्हे तर वर्धिनीसारखे तू वाढवत नेले आहेस हा योग जरा दुर्मिळच. सर्व विपरीत परिस्थितीवर मात करून तू तुझ्या व्यवसायात, कलेत तुझ्या लहान वयात मिळवलेले नाव व श्रेय तुझ्या कल्पकतेला जितके आहे तितकेच आर्थिक धाडसालाही द्यावे लागेल. 'Not Faliure but low aim is crime' 'बचेंगे तो और भी लढेंगे' ह्या बाण्यामुळे तू आजपर्यंत धडाधड पुढे गेलासच पण ह्यापुढेही कोणतेही अपयश तुला मागे खेचू शकणार नाही, याची मला पूर्ण खात्री आहे. एक कारण असेही असू शकेल की, तुझी झेप उत्तम, सर्वोत्तम, सर्वोत्कृष्ट संपादन केल्याशिवाय थकणारी नाही. चिकाटीला कमी नाही आणि हाताला दम नाही असा प्रवास असल्यावर अपयश कोठून येणार ? म्हणून वडिलांचे छत्र हरपले ह्यांनी दमछाक होणारा गडी तू नव्हेस. त्यांच्याइतकाच मलाही तुझ्याबद्दल अभिमान आहे आणि अनुकरण करावे असे तुझे व्यक्तिमत्त्व आहे. एका कवीने म्हटले आहे,

*'जे टाळणे अशक्य ।*
*दे शक्ती ते सहाय्या ॥*
*जे शक्य साध्य आहे ।*
*निर्धार ते कराया ॥*
*मज काय शक्य आहे ।*
*माझे मला कळाया ॥*
*दे बुद्धि देवराया, दे बुद्धि देवराया ॥।'*

अखेर उषःकाळ कितीही रम्य असला तरी सूर्यनारायण फार काळ तेथे थांबणे शक्य नसते हेच खरे. शेवटी तुला विनंती एवढीच आहे की, तुमच्या सर्व कुटुंबियांचे दुःखात मलाही सहभागी करून घ्यावेस.

आणि तुझ्या कुठल्याही अडचणीच्या प्रसंगी मला हाक मारायला हरकत नाही. शक्य असेल तर नक्की 'ओ' देईन.

श्रीमती आईला तू आतापर्यंत धीर जसा दिलास तसा पुढेही देशील यात मला संशय नाही. आता सर्वांना सावरणारा तूच आहेस.

कळावे लोभ तर आहेच वृद्धिची अपेक्षा आणि आवश्यकताही आहे.

सदैव आपला
चिरमंगलकांक्षी आणि स्नेहाकांक्षी,
कृ. ल. पटवर्धन

पितृछत्र हरवलेल्या आपल्या विद्यार्थ्यांचे, कार्यकर्त्यांचे सांत्वन करतानाच, दुःखाच्या परिस्थितीत, मनःस्थितीत असलेल्यांच्या मनाला उभारी कशी द्यावी, याचे हे पत्र म्हणजे एक उत्तम उदाहरण आहे.
स्व-रूपवर्धिनीचा वर्धक चित्रकार अवधुत फडणीस यांचे वडील ज्येष्ठ चित्रकार श्री. अरुण फडणीस यांच्या निधनानंतर लिहिलेले हे पत्र)



दि. ११/१२/०१
पुणे

मित्रवर्य श्री. निळकंठराव यांसी स.न.वि.वि.,

संघबंधनामुळे नवीन ओळखीसुद्धा कैक वर्षाची जुनी मैत्री असावी अशी सोय संघाने करून ठेवली आहे. याचे मुख्य कारण ह्या मैत्रीला ध्येयधुंदीचा सुगंध असतो. आचारविचारात एकवाक्यता असते आणि त्यामुळे एकदमच आपुलकीची ओढ लागते व ऋणानुबंध मैत्रीच्या धाग्यामुळे घट्ट बांधले जातात.

वरील सर्व विचार सुचण्याचे मुख्य कारण तसे पाहिले तर तुमची माझी ओळख २९/११ ची अगदी थोड्या वेळाची पण एकतर राजाभाऊंमुळे एकदम जवळीक साधली आणि दुसरे म्हणजे दोघांनाही एकच काम करायचे असल्यामुळे समान धागा सापडला.

मला वाटते वर्धिनीचे दिलेले साहित्य आपण एव्हाना वाचून संपविले असेल, नसल्यास आपण आपल्या सोयीसवडीने ते वाचावे ही विनंती.

१९२५ साली कै. डॉ. केशवरावांनी समाजाच्या अवनतीचे किंवा वैभव कमी झाल्याचे जे मूलभूत कारण शोधून काढले आणि संघ सुरू केला त्या संघाचे आपण सर्वजण पाईक आहोत.

मला असे आठवते आहे की, ३६ सालच्या डॉक्टरांच्या अधिकारी शिक्षण वर्गातील बौद्धिक वर्गात आपण परतंत्र का झालो ? आपल्या समाजात काय कमी आहे, आपल्या देशात कशाची वानवा आहे ? या सर्वांचे उत्तर एकच आहे. सामाजिक बांधिलकीचा अभाव, कर्तव्याची अजागरूकता, सामाजिक शिस्तीचा अभाव, राष्ट्रीय चारित्र्याचा अभाव आणि त्याहीपेक्षा जास्त संघटनेचा अभाव. याबद्दल चर्चा झाली होती. नेमके हेच दोष काढण्यासाठी संघाची स्थापना झाली. आणि हिंदू राष्ट्राचा डॉक्टरांनी उद्घोष केला. हेच मुख्य सूत्र पकडून आणि जवळपास तीच कार्यपद्धती धरून 'स्व'-रूपवर्धिनीची आम्ही काही मित्रमंडळींनी स्थापना केली. संघापेक्षा या पद्धतीत फक्त दैनंदिन शिक्षण जोडले आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, डॉ. मुरलीमनोहर जोशी यांचे मानवविकास आणि संशोधन असे जे काम आहे तेच काम आचरणात आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. शिवाय या शिक्षणसेवेबरोबर संस्कारक्षम वयात मुले निवडून त्यांना स्वतःपेक्षा समोरच्याचे दुःख जास्त महत्त्वाचे समजून ते दुःख हलके करण्याची भावना निर्माण केली पाहिजे हे शिकवितो.

***'ऐसी कळवळ्याची जाति । करी लाभाविण प्रीती ॥'***

अशी मुले बुद्धिवान असतील तर ती दुसऱ्याचे दुःख कौशल्याने

कमी करू शकतील, अधिक चांगली मदत करू शकतील. अशा बुद्धिमान मुलांची निर्णयशक्ती चांगली असेल तर त्याप्रसंगी हे लोक नेतृत्वही करू शकतील. आपुलकीने वागण्याची युक्ती त्यांना साधेल, टीका केली तरी मदतीचा हात सतत पुढे असल्यामुळे की काय ऐकणाऱ्यालाही वाईट वाटणारा नाही. 'He has a right to criticise who has a heart to help.' बाकी वर्धिनीसंबंधी अनेक गोष्टी लिहिता येण्यासारख्या आहेत पण ह्या सर्व धडपडीचे गंतव्यस्थान काय? मला वाटते, समर्पित वृत्तीचे, निःस्वार्थपणे समाजसेवक तयार करून कार्यानुकूल स्वभाव बनविणारी अशी मंडळी तयार झाली पाहिजेत, यासाठी हा सारा खटाटोप, धडपडाट गेली २३ वर्षे चालू आहे.

या कामातील यशाची मिमांसा किंवा आढावा मी घेत बसलो तर खूपच लांबेल.

म्हणून विस्तारभयास्तव येथेच थांबतो. शेवटी जाता जाता एवढीच विनंती करीन की हे काम पाहण्यासाठी आपण आपल्या सोयीसवडीने एकदातरी वर्धिनीला भेट द्यावी आणि पार्ले, सांताक्रूझ, अंधेरी, जोगेश्वरी या भागातील बँकांच्या किंवा अन्य जाहिराती मिळवता आल्यास पहावे किंवा प्रयत्न करावेत ही नम्र विनंती.

कळावे, घरच्या सर्व थोर मंडळींना सप्रेम नमस्कार, लहानांना गोड आशीर्वाद.

लोभ तर नक्कीच आहे. वृद्धीची नितांत निकड आहे.

सदैव आपला,
चिरमंगलाकांक्षी व स्नेहाकांक्षी
कृ. ल. पटवर्धन

कुठल्याही निमित्ताने परिचय झाला की अशा व्यक्तीशी अशा पद्धतीने संपर्क करीत रहायचे की नव्या परिचयातील अंतर गळून जायचे आणि तशी व्यक्ती अनेक वर्षांची स्नेही असल्यासारखी वर्धिनीच्या कामाला जोडायची ही किशाभाऊंची खासियत होती. पत्रातील उल्लेख असलेले श्री. नीळकंठराव जोशी हे मुंबईच्या उपनगरात राहणारे. तेथे राहून त्यांनी वर्धिनीला सहाय्य करावे यासाठी पाठविलेले हे पत्र पण ज्या कामासाठी त्यांनी सक्रिय व्हावे त्या कामाचे मोल प्रभावीपणाने त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचे सामर्थ्य कै. किशाभाऊंच्या लेखणीत होते.



दि. १६।१२।०१
पुणे

मित्रवर्य श्री. बंडा भिडे यांसी

स. न. वि. वि.,

पत्र लिहून काही एकमेकांवर संस्कार करावेत आणि एकमेकांवर त्याचा काही परिणाम होईल अशा वयाच्या पलीकडे आपण दोघेही गेलेलो आहोत असे मला वाटते. दोघांचीही जीवनदृष्टी आता पक्की झालेली आहे. आयुष्यातील सर्व सुखदुःखे, टक्केटोणपे दोघांनी आपण पुष्कळ अनुभवलेले आहेत. फक्त उर्वरित आयुष्य अधिक सुखाचे, आनंदाचे कसे जाईल एवढाच भाग आता शिल्लक राहिले आहे. तो परमेश्वराने (मानला तर) सुखात घालवण्याची शक्ती आणि स्वावलंबी जीवन जावे अशी प्रकृती परमेश्वराने ठेवावी एवढी एकच प्रार्थना मी त्या भगवंताची करीन.

बरेच महिन्यानंतर आपण तुझ्या घरी काही थोडा वेळ भेटलो होतो. त्यावेळी भेटीमुळे खूपच आनंद झाला. विशेषतः तू त्यावेळेला मोकळा होतास आणि घरी होतास, हा त्याहून आनंदाचा भाग. कितीही आपण बोललो तरी दोघांजवळ अनुभवाचा इतका प्रचंड साठा आहे की त्यामुळे कितीवेळ बोललो तरी ते अपुरेच ठरणार. त्यामुळे प्रत्येक भेटीनंतर बोलण्याच्या बऱ्याच गोष्टी शिल्लक राहणार आणि असमाधानानेच ताटातूट होणार. हे सगळे विचार सुचण्याचे कारण तू सांगितलेल्या काही दुःखद घटना, काही सुखाच्या चार गोष्टी यांनी सुखदुःखाच्या संमिश्र भावना मनात दाटून आल्या होत्या. पण एक गोष्ट निश्चित आहे की, तुझी गोजिरवाणी गोड नातवंडे पाहून मात्र समाधान झाले. सर्व कुटुंबांची स्वागतवृत्तीही लक्षात राहण्यासारखीच होती. असो.

मुंबईच्या माझ्या ८ दिवसांच्या मुक्कामात वर्धिनीच्या कामासाठी आता तरी हातामध्ये एक लाखाच्यावर निधी गोळा झाला आहे. माझा मात्र असा भ्रम नाही आणि नसावाही की, हे सर्व पैसे माझ्या कर्तृत्वाने वर्धिनीला मिळाले. धडपड मी जरूर केली. यश परमेश्वराने दिले. साधारणपणे जुने नवीन मिळून ३५ लोकांची भेट मी घेऊ शकलो. वर लिहिल्याप्रमाणे लाख रुपयांच्यावर धन हातात आले. आणि लाखो रुपये आणखी मिळतील असा संभव उत्पन्न झालेला आहे. वर्धिनीच्या मुलांचे नशीब काय आहे त्यावरती पैसे मिळणे अवलंबून आहे.

या सगळ्या प्रवासाचा मुख्य हेतू माझे काही मित्र, नातेवाईक, देणगीदार यांची ओळख माझ्याबरोबर आलेला मित्रवर्य ज्ञानेश पुरंदरेला

करून द्यावी हा होता. आणि तो बऱ्याच अंशी सफल झाला, असे मला वाटते. आणि त्याचेही कारण असे आहे की यापुढे मी मुंबईला शक्यतो येण्याचे टाळावे असे आता ठरविले आहे. पण त्याचबरोबर माझी जबाबदारी होती की, मी काम थांबविल्यानंतर हे काम अधिक गतीने चालू राहावे आणि त्याला द्रव्य आणि मनुष्यशक्ती कमी पडू नये त्यादृष्टीने बऱ्यापैकी प्रगती झाली असावी असे वाटते.

मी ज्यावेळी आता काम थांबविणार आहे, असे एका योजलेल्या बैठकीत जाहीर केले त्यावेळी सर्वांनी एकमताने, 'सर, तुम्ही काही काळजी करू नका, आम्ही दुप्पट वेगाने काम करू' असे मुले म्हणत होती. अर्थातच त्यावेळच्या माझ्या आनंदाला सुमार नव्हता. दिसते ते असे आहे की, खरोखरीच काम चांगले चालू आहे. 'स्व'-रूपवर्धिनीच्या ध्येयधोरणाला धरून अनेक नवीन उपक्रम मुलांनी सुरू केले आहेत. विशेष उल्लेखनीय म्हणजे स्पर्धापरीक्षा केंद्र, एम.पी.एस्स.सी., यु.पी.एस्स.सी. या परीक्षांचे वर्ग गरीबांसाठी परवडणाऱ्या शुल्कामध्ये चालू झाले असून आतापर्यंत गेल्या वर्षभरात याचा १२० स्पर्धकांनी फायदा घेतला आहे: कार्यकर्ते तयार होत आहेत. नवीन मुले येत आहेत, पुरेसा पैसाही येत आहे. ह्यापेक्षा आनंदाचा विषय कोणता असू शकेल ? मी तर आता जवळ जवळ वर्धिनीत जातच नाही. आवश्यकता पडल्यास आठवड्यातून एखादे वेळी जातो.

कळावे, ती. बऊबाईना शि. सा. न. सर्व थोर मंडळींना सप्रेम नमस्कार, सर्व बछड्यंना गोड आशीर्वाद.

लोभ तर आहेच आहे. वृद्धिची निश्चित निकड आहे. जमल्यास पत्रोत्तर येऊ शकले तर आनंदच.

सदैव तुझाच,
स्नेहाकांक्षी आणि चिरमंगलकांक्षी
कृ. ल. पटवर्धन

मुख्याध्यापक पदावरून निवृत्त झाल्यावर वर्धिनीचे काम सुरू केले. त्या कामाला दिशा दिली, आकार दिला. स्थैर्य दिले आणि बावीस वर्षांनी त्याही कामातून निवृत्त होताना पुढची फळी भक्कम उभे करण्याच्या कै. किशाभाऊंच्या धडपडीचे दर्शन या पत्रातून होते. कार्यकर्त्यांवर विश्वास ठेवून, दूर राहूनही काम कसे करता येते याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.



दि. ५।१।०२
पुणे

मित्रवर्य सुनील यांसी स. न. वि. वि.,

तुझा, माझा आणि विशेषत: रा. प. देसाई यांचा संबंध खूपच घट्ट होता. जीवनाचा आश्रम बदलला म्हणून तो हळूहळू थोडा थोडा पातळ होत गेला. तो पुन्हा हळूहळू जुळून जमवून यावा असा काहीसा विचार हे पत्र लिहिण्यामागे आहे, अर्थात तुझी इच्छा असेल तर.

तुझ्यासारखे आजही समाजात लपलेले अनेक हिरे आहेत हे मी गेली सुमारे ५० वर्षांहून अधिक काळ पाहत आहे. हे सर्व फार मोठे राष्ट्रधन आहे. जर त्यांना शोधून त्यांच्याकडे लक्ष देऊन त्यांना पैलू पाडले तर ! असे तुझ्यासारखे कसबी कलावंत मदतीला सोयी-सवडीने जरी आले तरी हे राष्ट्रधन राष्ट्रामध्ये तुझ्यासारखे धन उत्पन्न करू शकतील असे मला वाटते. मिळेल का तुझ्या मदतीचा हात ?

अनेक आठवणी तुझ्यासंबंधीच्या मनात अजूनही रेंगाळत आहेत. तुझ्या घरची स्थिती, आईची दयनीय वाणी, हताश झालेली तिची मनस्थिती, वडिलांचा जाच ह्या सर्व आपत्तीतून हिंमतीने तू काढलेला मार्ग आणि तुझ्या आईला दाखविलेले सुखाचे दिवस हे सर्व अजूनही डोळ्यांसमोर चित्रपटासारखे स्पष्ट रीतीने सरकते आहे.

वर्धिनीतही तुझ्यासारख्या मुलांसाठी तू घेतलेले कष्ट अविस्मरणीय आहेत. सणाचा दिवस, घरातील अडचण याकडे संपूर्ण दुर्लक्ष करून तू 'गटनायक' म्हणून केलेले काम हे विसरणेच अशक्य आहे.

पोटात भुकेचे कावळे कोकावत असताना दसऱ्याच्या दिवशी गटातील मुलांना सोने वाटत सुटणारा सोन्यासारखा तू, हे मला विसरून कसे चालेल आणि ह्या सर्व आठवणीपोटीच तुला इंडिया स्पॉन्सरशिप कमिटीने म्हणजेच डॉ. झुलीबेन नाखुदा, रा. प. देसाई यांनी पुढे सरसावलेला मदतीचा त्यांचा हात हे सर्वच्या सर्व अजूनही माझ्या डोळ्यांसमोरून हालत नाही आणि त्यामुळे तुझे आजचे यश हे नेत्रदीपकच आहे असेच म्हटले पाहिजे. माझी तुला एवढीच विनंती आहे की, असेच तुझ्यासारखे आजचे दिवस इतरांनाही दाखवण्यासाठी 'स्व'-रूपवर्धिनी अहोरात्र परिश्रम करीत आहे. सोय आणि शक्य असेल तर सवडीने आणि केव्हातरी जरी नुसता भेटून गेलास तरीही नक्कीच आनंदाची उर्मी येऊ शकेल. पाहा जमले तर !

चैतन्य मोहन तेंडुलकर अमेरिकेत मास्टर ऑफ इंजिनिअरिंग या परीक्षेत ८७.५० टक्के गुण मिळवून त्याच्या हेड ऑफ द डिपार्टमेंट श्री. अली गोलबझी ह्यांचे उत्कृष्ट शिफारस पत्र घेऊन तो उत्तीर्ण झाला. सोबत तुझ्या माहितीसाठी त्याचे पत्र पाठविले आहे इंडिया

स्पॉन्सरशिप कमिटी या संस्थेचा तुझ्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांनी फायदा घेऊन सुयश मिळविले आहे. त्या संस्थेचे कृतज्ञ होण्यासाठी त्यांनी जी पत्रे पाठविली आहेत त्याचाही एक नमुना मुद्दाम पाठवीत आहे. 'स्व'-रूपवर्धिनीसह अनेक व्यक्तींनी त्याला जी मदत केली त्या सर्वांना त्याने फूल ना फुलाची पाकळी म्हणून पाच-पाच हजार रु. असे एकूण ४० हजार रु. पाठविले आहेत.

ह्या आकड्याला महत्त्व नसून त्या मागे असलेल्या तुळशीपत्राच्या आणि कृतज्ञतेच्या भावनेला अधिक महत्त्व आहे, असे मला वाटते. तो विचार अधिक मोलाचा आहे.

चैतन्याच्या उदाहरणाचे तू त्याचे अनुकरण करावे अशासाठी दिले नसून अशी मुले 'स्व'-रूपवर्धिनीतून तयार झाली आणि तयार व्हावीत हे तुला समजावे एवढाच साधा, शुद्ध, नम्र हेतू आहे. तू नुसता येवून भेटला तरी धो धो आनंद होईल.

कळावे, तीर्थरूप आईला सादर नमस्कार, तुझ्या पत्नीला आणि मुलाबाळांना मनापासून गोड गोड आशीर्वाद. तू स्वतः येऊ शकलास तर उत्तमच पण वेळेअभावी तू जर चार ओळींचे साधे पत्रोत्तर पाठविले तरीही आनंद आणि बरे वाटेल.

लोभ तर नक्कीच आहे. वृद्धीची अपेक्षा आणि आवश्यकताही आहे.

सदैव आपला<br>
चिरमंगलाकांक्षी व स्नेहाकांक्षी,<br>
पटवर्धन सर<br>
कृ. ल. पटवर्धन

सर्व प्रकारच्या प्रतिकूलतेवर मात करून यशस्वी होण्याच्या वाटेवरील चैतन्य तेंडूलकर या वर्धकाचा पराक्रम आणि तशाच वातावरणातून पुढे आलेल्या सुनील सुर्वे या विद्यार्थ्याला लिहिलेले हे पत्र. निमित्त आहे चैतन्यचे कौतूक त्याच्यापर्यंत पोहोचवण्याचे. पण हेतू निश्चितच आहे की सुनीलसारख्या विद्यार्थी कामात सक्रीय व्हावा. अशा कित्येक विद्यार्थ्यांच्या जीवनाशी कै. किशाभाऊ एकरूप झालेले होते आणि म्हणूनच अनेक प्रसंगी त्यांच्या आठवणी अशा पत्रांतून, गप्पांमधून व्यक्त व्हायच्या.



दि. १७ जानेवारी २००२<br>
पुणे

मित्रवर्य सुदामजी यांसी,

स. न. वि. वि.

आपले 'सोनदरा गुरूकुलम्' च्या वार्षिक पालक मेळाव्याचे निमंत्रण मिळाले. जे काम तुम्ही करीत आहात त्याला तोड नाही.

***"असू आम्ही सुखाने पत्थर पायातील।***<br>
***मंदीर उभविणे हेच अमुचे शील"***

हे काव्य मी अनेक वेळेला वाचले आहे असे म्हणणारे अनेक, करणारा एखादाच. दुसऱ्या पद्धतीने असेही म्हणता येईल की,

***भाट भेटतात ठायी ठायी, वाट दाखविणारा एखादाच***<br>
***नक्राश्रु ढाळणारे अनेक, अश्रू पुसणारा एखादाच***<br>
***प्राण घेणारे अनेक, जीव ओवाळणारा एखादाच***<br>
***असा 'एखादाच' मीच असावा, पण 'मी' पणाचा गर्व नसावा***

पण या काव्याचा काव्यार्थ लक्षात घेऊन पायाच्या दगडासारखे स्वतःला पुरून घेऊन देश विकासासाठी, सामाजिक स्वास्थ्यासाठी, राष्ट्रमंदिर उभारण्यासाठी काम करणारा माणूस 'एखादाच' किंवा असेही म्हणता येईल की, बहिर्गोल भिंगातूनच (सूक्ष्मदर्शक) पहावे लागेल. इतकी ती माणसे दुर्मिळ आहेत. इतिहासाच्या पानांमध्ये प्रत्यक्ष नावाने नसले तरी गुणांनी ज्यांची नोंद ठसठशीतपणे घ्यावी लागेल अशा काही महाभाग्यवान लोकांमध्ये आपले नाव निश्चितच झळकेल नव्हे कोरावे लागेल.

बहुतेकांना चकाकणाऱ्या कळसाच्या जागीच आपली नेमणूक असावी आणि जाणाऱ्या येणाऱ्या वाटसरूंनी त्या कळसाचे कौतुक करावे हीच बहुतेकांची अपेक्षा. झोकून देऊन काम करणे, निरपेक्ष समाजसेवा करणे, समाजाच्या भल्यासाठी झिजणे या व्रताकडे सहसा कोणी झुकत नाही. सुदैवाने डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्यासारख्या द्रष्ट्याने अशी सामान्य माणसे वेचून त्यांच्या सहवासाचा परीस लाभल्यानंतर त्याचे त्यांनी सोने केले. त्यातून त्यांनी अनेक क्षेत्रात अखिल भारतीय नेतृत्व उभे केले, हे खरोखरी नुसतेच कौतुकाचे नव्हे तर आश्चर्याच्याही पलीकडचे आहे. म्हणून आपण सर्वच जण डॉक्टरांसंबंधी असे म्हणू या की,

***कुणा जन्माने ते पुण्य। त्यांच्या रूपात भेटले॥***<br>
***माझे काळोखाचे पर। त्यांच्या प्रकाशात न्हाले॥***<br>
***तेज ओसंडून वाहे। एक थेंबही आटेना॥***<br>
***ऋण फिटता फिटेना।***<br>
***ऋण फिटता फिटेना॥***

अधिक काय लिहू ? अशा सुमंगल प्रसंगी येणे आवश्यक आहे, यायलाही पाहिजे परंतु परिस्थिती, प्रकृती, प्राकृतिक अंतर ही सगळीच 'मंडळी' मार्गात आडवी येऊन थांबलेली आहेत. त्यामुळे पाऊल पुढे पडणे जरा कठीणच दिसते आहे. म्हणून तुम्ही तुमच्या मोठ्या मनाने आमच्या या लहानशा असहाय्यतेबद्दल क्षमा करावी, ही आपल्याला नम्र प्रार्थना.

आपल्या घरच्या सर्व थोर मंडळींना सप्रेम नमस्कार. लहानांना गोड गोड आशीर्वाद आणि आपल्या सर्व आश्रमवसियांना सप्रेम वंदे !


कळावे, लोभ तर आहेच आहेच वृद्धीची अपेक्षा व आवश्यकताही आहे.

कार्यक्रमाच्या यशासाठी मनःपूर्वक भरघोस शुभेच्छा !

सदैव आपला
चिरमंगलाकांक्षी आणि स्नेहाकांक्षी,
कृ. ल. पटवर्धन

**श्री. सुदामजी भोंडवे हे नानाजी देशमुख यांच्या 'सोनदरा' गुरूकुलची जबाबदारी अत्यंत कुशलतेने पार पाडत आहेत. अशा दूर डोंगराच्या कुशीत, प्रसिद्धीच्या वलयांपासून दूर राहून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची काम करीत राहण्याची प्रेरणा टिकून राहते ती अशा आंतरिक ओलाव्याने लिहिलेल्या अशा पत्रांतून, शाबासकीतून !**

स्वर्गीय विशाभाऊ पटवर्धन यांची ही पत्रे विलक्षण बोलकी आहेत. अत्यंत पारदर्शक आहेत. त्यांतून पूजनीय डॉक्टर हेडगेवार यांच्या सान्निध्याचा त्यांच्यावर झालेला राष्ट्रभक्तीचा संस्कार जाणवतो. समाजहिताची तीव्र तळमळ, उपेक्षितांबद्दलचा 'लाभाविण प्रीत' म्हणतात कळवळा आणि हे ज्यातून निर्माण झालं ते त्यांचं अत्यंत संवेदनाशील मन हे सर्व या पत्रांतून प्रकटतं. तसंच प. पो. जोशी यांच्या सान्निध्यातून त्यांनी उचललेलं व्यावहारिक नेटकेपण हे ही या पत्रांतून जाणवतं. विशाभाऊंसारख्या प्रखर कर्मयोग्याच्या हृदयातला एक हळवा कवी काही वेळा जाणवतो. काही वेळा एक निश्चिंत मिश्किलही जाणवतो. सहधर्मचारिणी लीलाताईंचा उल्लेखही खूप काही सांगणारा आहे. एकूण ही सर्व पत्रे विशाभाऊंच्या प्रेरणादायी व्यक्तिमत्वाचा, सेवाभावी व्यक्तिमत्वाचा एक आदर्श मानदंड आपल्या समोर उभा करतात.



स्व-रूपवर्धिनी, पुणे